सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक १३२ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रेशन दुकानदारांसाठी फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

मुंबई : राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना (अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब) अन्न, धान्याचे (शिधा) वितरण करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या अर्थात रेशन दुकानदारांच्या मार्जिनच्या रकमेत वाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री



छगन भुजबळ यांनी दिली. राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनद्वारे अन्नधान्याच्या वितरणासाठी रास्त भाव दुकानदारांना सध्या देण्यात येणाऱ्या १५०/- रुपये प्रति क्विंटल (१५०० प्रति मेट्रिक टन) या मार्जिन दरामध्ये २०/- प्रति क्विंटल (२०० प्रति मेट्रिक टन) एवढी वाढ करून त्यांना १७०/- प्रति क्विंटल (१७०० प्रति मेट्रिक टन) मार्जिन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे राज्याच्या तिजोरीवर अंदाजित वार्षिक ९२.७१ कोटी इतका अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. यावेळी बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, गेले अनेक दिवसांपासून रास्त भाव दुकानदारांची मार्जिन मध्ये वाढ करण्याची मागणी होती. याबाबत अनेक बैठका देखील पार पडल्या होत्या. रास्त भाव दुकानदारांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक होते त्यामुळे मंत्रिमंडळाने रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

## पंजाबमध्ये बब्बर खालसाचे ५ दहशतवादी जाळ्यात

चंदीगड : पंजाब पोलिसांनी मंगळवारी राजस्थानमधून पाच संशयितांना ताब्यात घेतले असून, या सर्वांचा संबंध पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेशी संबंधित दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. पंजाबचे पोलिस महासंचालक (डीजीपी) गौरव यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एकाला पोलिसांशी झालेल्या चकमकीत गोळी लागून तो जखमी झाला आहे. आरोपींना ताब्यात घेण्यापूर्वी पोलिस आणि संशयितांमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. डीजीपी यादव यांनी सांगितले की, या आरोपींचे पाकिस्तानस्थित ऑपरेटिव्ह हरविंदर रिंडा याच्याशी थेट संपर्क होते आणि ते त्याच्या निर्देशांनुसार काम करत होते. प्राथमिक चौकशीतून उघड झाले आहे की, आरोपी पंजाब आणि इतर काही राज्यांमध्ये दहशतवादी कारवाया करण्याच्या तयारीत होते.

स्वातंत्र्यदिनाआधी पंजाब पोलिसांनी दहशतवादी कट हाणून पाडला

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पंजाब पोलिसांनी मोठी कारवाई करत पाकिस्तान समर्थित दहशतवादी कट उधळून लावला आहे. पकडण्यात आलेल्या दहशतवाद्यांनी शहीद भगतसिंग नगर आणि पंजाबमधील इतर काही ठिकाणी हल्ल्याची योजना आखली होती. पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा कट अंमलात येण्याआधीच हाणून पाडण्यात आला. पंजाबचे पोलिस महासंचालक (डीजीपी) गौरव यादव यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर ऑपरेशनची सविस्तर माहिती दिली.

## गायीला राष्ट्रीय प्राण्याचा दर्जा नाही : एस. पी. सिंग बघेल

नवी दिल्ली : केंद्रीय मत्स्य, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री एस. पी. सिंग बघेल यांनी मंगळवारी (१२ ऑगस्ट) संसदेत दिलेल्या माहितीत स्पष्ट केले की, भारतात गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा कोणताही विचार किंवा योजना केंद्र सरकारकडे नाही.

राज्यमंत्री बघेल यांनी सांगितले की, गायीला राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्यासाठी कोणताही कायदा करण्याचा प्रस्ताव सध्या केंद्र सरकारच्या विचाराधीन नाही. संसदेत विचारलेल्या या प्रश्नाच्या उत्तरादरम्यान त्यांनी हे स्पष्टीकरण दिले. या विधानामुळे, काही काळापासून समाजात आणि राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याच्या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. सध्या देशात वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून मान्यता प्राप्त असून, गायीच्या



संदर्भात सरकार कोणताही कायदेशीर बदल करण्याच्या भूमिकेत नाही, हे या वक्तव्यामुळे स्पष्ट झाले.

लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात बघेल म्हणाले, नाही साहेब. संविधानाच्या कलम २४६ (३) नुसार, केंद्र आणि राज्यांमधील विधायी अधिकारांच्या विभागणीप्रमाणे प्राण्यांचे संरक्षण हे राज्य विधानसभेच्या विशेषाधिकारातील विषय आहे आणि याबाबत कायदा करण्याचा अधिकार केवळ राज्यांना आहे. हा प्रश्न वरिष्ठ भाजप नेते आणि माजी उत्तराखंड मुख्यमंत्री त्रिवेंद्रसिंह रावत यांनी लोकसभेत उपस्थित केला होता.

केंद्रीय मंत्री बघेल यांनी पुढे सांगितले की, केंद्र सरकार डिसेंबर २०१४ पासून 'राष्ट्रीय गोकुल मिशन' राबवत आहे. या योजनेचा उद्देश म्हणजे गायींच्या संवर्धन, संरक्षण आणि पालन-पोषणासाठी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी हाती घेतलेल्या उपक्रमांना सहाय्य व बळकटी देणे.

दूध उत्पादनासंदर्भात माहिती देताना बघेल म्हणाले की, २०२४ मध्ये देशात एकूण २३९.३० दशलक्ष टन दूध उत्पादन झाले असून, त्यापैकी गायीच्या दुधाचा वाटा ५३.१२ टक्के, तर म्हशीच्या दुधाचा वाटा ४३.६२ टक्के आहे. गायीच्या दुधाचे देशाच्या एकूण दूध उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे यावरून स्पष्ट होते. तसेच, राष्ट्रीय गोकुल मिशनमुळे राज्यस्तरावरील गोधन संवर्धन उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## न्यायमूर्ती यशवंत वर्मा संकटात! महाभियोग प्रस्तावाला लोकसभेची मंजुरी, तपास समिती सक्रिय

नवी दिल्ली : अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधातील वादग्रस्त रोख रक्कम प्रकरणात आता मोठी कारवाई सुरू झाली आहे. मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांच्या विरोधात सादर झालेल्या महाभियोग प्रस्तावाला मंजुरी दिली. या प्रस्तावावर एकूण १४६ खासदारांनी स्वाक्षरी केली असून, यात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोन्ही गटांतील नेते सहभागी आहेत. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर लोकसभा अध्यक्षांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय तपास समितीची स्थापना केली आहे. समितीमध्ये नियुक्त न्यायाधीशांची नावेही अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहेत. या घडामोडीनंतर न्यायमूर्ती वर्मा यांच्या अडचणी आणखी वाढल्या असून, संपूर्ण प्रकरणावर देशभराचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्तावाच्या चौकशीसाठी गठीत केलेल्या तीन सदस्यीय समितीचे स्वरूप जाहीर केले आहे. या समितीत सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि कायदा क्षेत्रातील तज्ज्ञ अशा तिन्ही क्षेत्रांतील प्रतिनिधींचा समावेश आहे. समितीमध्ये सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, कर्नाटक उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ बी. बी. आचार्य आणि मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंद्र मोहन श्रीवास्तव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीचा अहवाल सादर होईपर्यंत महाभियोग प्रस्ताव प्रलंबित राहणार असून, या चौकशी अहवालानंतरच पुढील कारवाईबाबत निर्णय घेतला जाणार आहे. या घडामोडीमुळे संपूर्ण न्यायव्यवस्थेचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष या प्रकरणाकडे



लागले आहे.

नोटांचे गठ्ठे सापडल्याने वर्मा प्रकरणात गंभीर वळण

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्तावामागील पार्श्वभूमीवर एक धक्कादायक घटना उघड झाली आहे. यावर्षी १४ मार्च रोजी, दिल्ली उच्च न्यायालयात कार्यरत असताना त्यांच्या सरकारी निवासस्थानी अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आग नियंत्रणात आणली. मात्र, आग विझवल्यानंतर स्टोअर रूममधील दृश्याने सर्वांना हादरवून सोडले. तिथे एका पोत्यामध्ये प्रत्येकी ५०० च्या जळालेल्या नोटांचे गठ्ठे सापडले होते. या प्रकरणानंतरच न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरोधात गंभीर शंका निर्माण झाली आणि पुढील चौकशीची प्रक्रिया सुरू झाली.

कट रचून अडकवल्याचा गंभीर आरोप

आग आणि रोख रकमेच्या प्रकरणानंतर न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी आपली बाजू मांडताना स्पष्ट केले की, त्यांच्या निवासस्थानी किंवा इतर कुठल्याही ठिकाणी रोख रक्कम नव्हती आणि त्यांना एका कटाचा भाग म्हणून जाणीवपूर्वक अडकवले जात आहे. या घडामोडीनंतर काही दिवसांतच, म्हणजे २८ मार्च रोजी, केंद्र सरकारच्या आदेशानुसार त्यांची बदली दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात करण्यात आली.

महाभियोग प्रस्ताव कसा मंजूर होतो?

महाभियोग प्रस्ताव ही अशी संसदीय प्रक्रिया आहे, ज्याद्वारे सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना त्यांच्या पदावरून दूर केले जाऊ शकते. यासाठी सर्वप्रथम संसदेतल्या कोणत्याही एका सभागृहात लोकसभा किंवा राज्यसभा प्रस्ताव सादर केला जातो. हा प्रस्ताव संबंधित सभागृहाच्या अध्यक्षांकडे सुपूर्द केला जातो. अध्यक्षांकडून प्रस्ताव स्वीकारल्यानंतर, त्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी विशेष समिती गठित केली जाते. या समितीत एक सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, एक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एक प्रख्यात कायदेतज्ज्ञ यांचा समावेश असतो. समितीचा अहवाल मिळाल्यानंतर, दोन्ही सभागृहांत दोन-तृतियांश बहुमताने प्रस्ताव मंजूर झाल्यास संबंधित न्यायाधीशाला पदावरून हटवले जाते.

## देशातील ६११५ रेल्वे स्थानकांवर मोफत वायफाय सेवा - अश्विनी वैष्णव

नवी दिल्ली : भारतीय रेल्वे देशभरातील ६,११५ रेल्वे स्थानकांवर मोफत थळ-ऋळ सुविधा देत आहे. ही माहिती सरकारने आज, मंगळवारी संसदेत दिली. रेल्वे स्थानकांवरील मोफत Wi-Fi सेवा ही 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमाचा एक भाग आहे, ज्याचा उद्देश शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल अंतर कमी करणे आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात सांगितले की, भारतीय रेल्वेच्या जवळजवळ सर्व स्थानकांवर दूरसंचार सेवा प्रदात्यांमार्फत ४जी/५-जी कव्हरेज दिले जात आहे. या नेटवर्कचा वापर प्रवासी डेटा कनेक्टिव्हिटीसाठी करीत आहेत, ज्यामुळे त्यांना अधिक चांगला अनुभव मिळत आहे. याशिवाय, रेल्वेने ६,११५ स्थानकांवर मोफत वायफाय सेवा उपलब्ध करून दिली आहे. या स्थानकांवर प्रवासी मोफत वायफायचा वापर करून एचडी व्हिडिओ पाहू शकतात, मनोरंजन सामग्री डाउनलोड करू शकतात आणि ऑफिसचे कामही करू शकतात. वायफाय सेवेचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांनी त्यांच्या स्मार्टफोनवर वायफाय मोड सुरू करावा लागतो आणि 'RailWire' Wi-Fi शी कनेक्ट व्हावे लागते. त्यानंतर त्यांना ओटीपी मिळवण्यासाठी आपला मोबाईल क्रमांक द्यावा लागतो आणि ओटीपी टाकल्यावर वायफाय कनेक्टिव्हिटी मिळते.

## महिला युवकांना स्थान देत भाजपा शहर कार्यकारिणी घोषित

छत्रपती संभाजीनगर - भारतीय जनता पक्ष छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

जिल्हा कार्यकारिणीमध्ये चार जिल्हा सरचिटणीस, सोळा उपाध्यक्ष, चौदा सचिव, एक कोषाध्यक्ष यासह महिला मोर्चा आणि युवा मोर्चा अध्यक्ष अशी अतिशय संतुलित कार्यकारिणी बनवण्यात आली आहे.

आगामी काळातील होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता सर्वच जातीसमूहांना स्थान देण्यात आलेले आहे. महिला पदाधिकाऱ्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. नवतरुणांना संधी देत व सामाजिक समतोल राखून कार्यकारिणी बनलेली आढळून येते. कार्यकारिणीमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी दिलेली दिसून येते.

जिल्हा कार्यकारिणीमध्ये प्रामुख्याने सरचिटणीस पदी श्री ताराचंद गायकवाड, श्री हर्षवर्धन कराड, श्री रामेश्वर भादवे, सौ. छायाताई खाजेकर यांना सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

शहर जिल्हा सचिव म्हणून श्री प्रवीण कुलकर्णी, श्री सिद्धार्थ साळवे, श्री नितीन खरात, श्री प्रदीप बुरांडे, श्री नंदलाल गवळी, सौ. रूपाली वाहुळे, श्री विवेक राठोड, श्री अशोक जगधने, श्री सागर पाले, श्री अमित लोखंडे, श्री कल्याण धुळे, श्री अजय शिंदे, सौ. गीता आचार्य, सौ. मीना खरे यांना जिल्हा सचिव पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

शहर जिल्हा कोषाध्यक्ष म्हणून श्री संजय खंनाळे, भारतीय जनता युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी श्री राहुल दांडगे तर महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी सौ. डॉ. उज्वला दहिफळे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

शहर जिल्हा अध्यक्ष श्री किशोर शितोळे यांनी ही नियुक्ती केली असून, महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री. अतुलजी सावे, माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री व राज्य सभा खासदार डॉ. भागवत कराड, विधान परिषद आमदार श्री. संजयजी केणेकर, आमदार सौ. अनुराधा चव्हाण तसेच माजी महापौर श्री. भगवान घडामोड यांनी अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या सह सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## दहीहंडीच्या सरावावेळी ११ वर्षांच्या गोविंदाचा मृत्यू

मुंबई : दहीहंडी या सणाला आता एक आठवड्यापेक्षा कमी कालावधी उरला आहे. गोविंदा पथकांचा दहीहंडी फोडण्याचा सराव जोरात सुरू आहे. अशा वेळी मुंबईतून एक दुःखद बातमी आली आहे. मुंबईतील दहिसरमध्ये केतकीपाडा परिसरात दहीहंडीच्या सरावावेळी ११ वर्षांच्या गोविंदाचा मृत्यू झाला. महेश रमेश जाधव याचा सरावावेळी उंचावरुन पडल्यामुळे मृत्यू झाला.

सराव सुरू होता, महेश वरच्या थरावर पोहोचण्यासाठी वेगाने हालचाली करत होता. पण चढत असताना त्याचा तोल आणि घात झाला. तो जमिनीवर कोसळला. डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी जास्त वेळच मिळाला नाही. दहिसर पोलिसांनी महेशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटना नेमकी कशी घडली, याचा तपास सुरू आहे. यंदा १६ ऑगस्ट रोजी दहीहंडी आहे. मुंबईतील दहीहंडी उत्सव जगभर प्रसिद्ध आहे. हजारो गोविंद पथके या उत्सवात सहभागी होतात.

## तुरुंगातून बाहेर येताच सय्यदला तिनं हार घातला आणि रात्री सय्यदनेच तिच्यावर गोळीबार केला

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. हर्सूल तुरुंगातून बाहेर आलेल्या सय्यद फैजल सय्यद एजाज उर्फ तेजा याचे त्याच्या मैत्रीणीने हार घालून स्वागत केले. पण रात्री अनेपेक्षित असे घडले. सय्यदने मैत्रीणीला भेटून तिच्यावर थेट गोळीबार केला. या गोळीबारात सय्यदची मैत्रीण जखमी झाली. जखमी असलेल्या महिलेवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गोळीबाराचे कारण अद्याप समजलेले नाही. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

सय्यद किलेअर्क भागातील



रहिवासी आहे. स्थानिक त्याला गुंड म्हणूनच ओळखतात. तुरुंगातून बाहेर आलेल्या सय्यदचे मैत्रीणीने हार घालून स्वागत केले होते, त्यामुळे त्याने मैत्रीणीवर रात्री अचानक भेटून गोळीबार का केला ? हा प्रश्न अनेकांना पडला आहे.

सय्यदवर बलात्कार, शस्त्रसाठा, ड्रग्स तस्करी, खुनाचा प्रयत्न, चोरी यासारखे पंधरा पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. रात्री तो नशा करुन बेगमपुरात मैत्रीणीला भेटण्यासाठी आला. यावेळी सय्यद आणि त्याच्या मैत्रीणीचा वाद झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली. यानंतर सय्यदने मैत्रीणीवर गोळीबार केला. गोळीबाराचा आवाज ऐकून स्थानिक घटनास्थळी पोहोचले, तोपर्यंत सय्यद पळून गेला होता. पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनेची सविस्तर माहिती घेतली आणि लगेच तपास सुरू केला.

## राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजनेचा लाभ घ्या- जिल्हाधिकारी स्वामी

### आदिवासी महिला बचतगटांचा मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१२ - आदिवासी महिला भगिनींनी आपल्या स्वतःवर विश्वास ठेवून प्रत्येक क्षेत्रात जबाबदारीने पुढे येऊन काम करावे आणि यशस्वी व्हावे. आदिवासी महिलांना सक्षम करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण व सबलीकरण योजना राबविली आहे. त्याचा लाभ सर्व आदिवासी महिलांनी घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आदिवासी महिला बचत गटाचा मेळावा शनिवारी (दि.९) आयोजीत करण्यात आला. राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजने चा शुभारंभ सोहळा आयोजीत करण्यात आला होता. मुख्य सोहळा नागपूर येथे पार पडला. दुरदृष्यप्रणालीद्वारे या सोहळ्यात सगळ्यांनी सहभाग घेतला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, प्रकल्पाधिकारी श्रीमती चेतना मोरे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या मेळाव्यास छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर या जिल्ह्यातून आदिवासी महिला बचत गट उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, स्त्री एक शक्ती आहे, स्त्री ही अबाला नसून सबला आहे. विविध क्षेत्रात महिलांनी आपल्या स्वतः च्या कार्यकर्तुत्वाने उत्तुंग भरारी घेऊन नाव लौकिक मिळविला असून पुरुषांच्या बरोबरीने समर्थपणे जबाबदारी निभावत आहे. आपणही शासनाच्या योजनेचा लाभ घेऊन आपली व आपल्या कुटुंबाची प्रगती साधावी. मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित म्हणाले की, आदिवासी महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवून प्रत्येक क्षेत्रात मार्गक्रमण केले पाहिजे.

याप्रसंगी उपस्थित आदिवासी महिलांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांना राखी बांधून औक्षण केले. सभागृहात आदिवासी विकास विभागाचा मुख्य कार्यक्रम हा नागपूर ते संपन्न झाला. त्याचे थेट उपस्थित आदिवासी महिला बचत गटाच्या महिलांना व युवकांना दाखवण्यात आले. सूत्रसंचालन सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ. उद्धव वायाळ यांनी केले व आभार कार्यलय अधीक्षक गजानन रत्नपारखी यांनी केले.

## महाराष्ट्रात जम्बो पोलिस भरतीचं बिगुल! १५ हजार पदांसाठी आजच हिरवा कंदील

मुंबई : महाराष्ट्रातील हजारो तरुणांची गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेली प्रतीक्षा अखेर संपण्याच्या मार्गावर आहे. राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक आज (मंगळवार) पार पडणार असून, त्यामध्ये तब्बल १५ हजार पोलिस पदांच्या भरतीसंदर्भात निर्णायक निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. या भरतीची घोषणा होऊन बराच कालावधी लोटला असला तरी, प्रत्यक्षात प्रक्रिया सुरू होण्यात झालेल्या विलंबामुळे उमेदवारांमध्ये नाराजी आणि संभ्रमाचे वातावरण होते. अनेक तरुणांनी तयारीसाठी वेळ, परिश्रम आणि आर्थिक गुंतवणूक केली असताना, प्रक्रिया लांबल्याने त्यांच्या संयमाची कठीण परीक्षा झाली. मात्र, अधिकृत सूत्रांच्या माहितीनुसार, मंत्रिमंडळाकडून मंजुरी मिळाल्यानंतर ही भरती प्रक्रिया अत्यंत जलदगतीने राबवली जाणार आहे. यामुळे राज्यभरातील उमेदवारांमध्ये नवचैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही भरती राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तसेच पोलिस दलात तरुणांना संधी देण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीकडे राज्यातील लाखो तरुणांचे डोळे लागले आहेत.

महायुती सरकारकडून मोठी घोषणा लवकरच

राज्यातील युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्याच्या तयारीत महायुती सरकार आहे. लवकरच १४ हजार पोलिस पदांच्या भरतीची अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील पोलिस दलात नव्या व



ताज्या दमाच्या तरुणांची भर पडणार असून, कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल. रोजगाराच्या संधींची वाढ आणि तरुणांना सरकारी सेवेत प्रवेश मिळणे या दोन्ही बाबतीत ही भरती मोलाची ठरणार आहे. मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर भरतीसंदर्भातील जाहिरात लवकरच प्रसिद्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे पोलिस दलाला नवचैतन्य मिळेल, तसेच अनेक तरुणांच्या स्वप्नांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जातो. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर पोलिस भरतीची तारीख निश्चित होण्याची प्रतीक्षा सुरू होती. आता ही घोषणा होण्याच्या उंबरठ्यावर असून, राज्यातील युवकांचे लक्ष या घडामोडीकडे लागले आहे.

मंत्रिमंडळ बैठकीला भरत गोगावले गैरहजर; नाराजीच्या चर्चेला उधाण

आज राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडत असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्रीनगर दौऱ्यावर असल्याने त्यांनी ऑनलाईन माध्यमातून सहभाग नोंदवला. मात्र, शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले हे देखील बैठकीला अनुपस्थित राहणार असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. रायगड जिल्ह्यात यावर्षी १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणाचा मान आदिती तटकरेंना देण्यात आल्याने जिल्ह्याचे पालकमंत्रीपद त्यांच्याकडे दिले जाऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे. यामुळे भरत गोगावले नाराज झाले असून ते दिल्लीला रवाना झाल्याच्या बातम्या समोर आल्या. तथापि, स्वतः भरत गोगावले यांनी या नाराजीच्या बातम्यांना फेटाळून लावत सांगितले की, ते दिल्लीत वैयक्तिक आणि अधिकृत कामानिमित्त गेले आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळ बैठकीला अनुपस्थित राहणे हे केवळ कार्यक्रमातील अडचणीमुळे झाले असून, त्याचा नाराजीशी काहीही संबंध नाही. या घडामोडींमुळे रायगड आणि राज्यातील राजकीय वातावरणात मात्र उत्सुकता निर्माण झाली आहे.

राज्य मंत्रिमंडळातील महत्त्वाचे निर्णय

अन्न व नागरी पुरवठा विभाग -राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ करण्याचा निर्णय. सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरणाची प्रक्रिया अधिक प्रभावी होणार.

विमानचालन विभाग - सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवासासाठी Viability Gap Funding देण्यास मान्यता. या निधीमुळे या मार्गावरील हवाईसेवा आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य होणार.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - विभागाच्या अखत्यारीत असलेल्या महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांमधील जामीनदाराच्या अटी शिथिल करण्याचा निर्णय. तसेच शासन हमीस ५ वर्षांची मुदतवाढ.

गृह विभाग - महाराष्ट्र पोलिस दलात सुमारे १५,००० पदांच्या मोठ्या प्रमाणातील भरतीस मंजुरी.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड-मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज जिल्ह्यातील मुख्य इमारतींचे इलेव्हेशन प्लॅन, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय आराखडा, ग्रंथालय इमारत, सहकार संकुल आदी विविध विकास कामांचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात झालेल्या या बैठकीस सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, धनंजय मुंडे, नमिता मुदंडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

बीड जिल्ह्याकरीता महसुल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रशासकीय इमारती उभारण्यात येत आहे. या सर्व इमारती एकाच परिसरात एकसमान उभारण्यात याव्यात. तसेच जिल्ह्याकरीता उभारण्यात येणारे जिल्हा ग्रंथालय, सहकार भवन या इमारती सुसज्ज आणि सर्व सुविधा असलेल्या उभारण्यात याव्यात. संबंधीत विभागानी या इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा. या सर्व प्रशासकीय इमारती उभारण्याचे काम अतिशय गतीने आणि दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक इमारतीमध्ये सुर्यप्रकाश, व्हेंटीलेशन आणि सोलर सिस्टीमचा समावेश करावा.



तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, सुमारे ५० वर्ष जूने असुन, ज्या इमारती कालबाह्य झाल्या आहेत, त्या इमारती धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यासाठीचा विकास आराखडा तयार करावा. तसेच या रुग्णालयात रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांच्या सुविधा येथे उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन पाठवावा. तसेच याठिकाणी काम करणारे अधिकारी-कर्मचारी यांची निवासस्थाने सुसज्ज व सर्व सुविधा असतील याची काळजी घ्यावी. रुग्णालयाच्या विकासासाठी नियमानुसार जे काही लागणार आहे, त्याचा प्लॅन तयार करुन सादर करावा.त्यास मान्यता आणि निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून परळी वैजनाथ येथे रु.२८६.६८ कोटींचा तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पात काही बदल सुचवून रु.३५१.०० कोटी रक्कमेच्या सुधारित आराखड्यास जिल्हास्तरीय समितीमध्ये मान्यता देण्यात आली. आता हा आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यास लवकरच मान्यता प्राप्त करुन घेण्यात येईल. परंतू श्री क्षेत्र परळी वैजनाथ मंदिरास त्याचे पूरातन मुळ स्वरुप प्राप्त करण्यासाठीचा तसेच मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करावा. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी उभारण्यात येणाऱ्या सर्व इमारतीची संबंधीत अधिकारी आणि वास्तूरचनाकार यांच्याकडून सविस्तर आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या.

बीड - अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड-मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच अंबेजागाई येथील लमान तांडा येथे नवीन कारागृहासाठी लागणाऱ्या जागेसाठी पाठपूरावा करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कंकालेश्वर देवस्थानाची असलेली १२ एकर जागेस संरक्षण भिंत उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे निर्देश दिले.

महसूल भवनाचे भूमिपूजन

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महसुल भवनाचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगतीपथावर असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची देखील पाहणी करत संबंधीतांकडून महसूल भवन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची माहिती घेवून संबंधीतांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच इमारतीचे काम दर्जेदार करण्याच्या सूचनाही संबंधीतांना त्यांनी दिल्या.यावेळी सर्वश्री विक्रम काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.



पंधरा दिवसापासून पावसाने ताण दिल्यामुळे खरिपाच्या पिकांना धोका निर्माण झाला होता. मात्र पावसाने दोन दिवसापासून बीड जिल्ह्यात दमदार हजेरी लावल्यामुळे खरिपाच्या पिकास जीवदान मिळाले आहे.

# साहस आदोडे यांची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या बीड जिल्हाअध्यक्षपदी सर्वानुमते निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

बीड येथे महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाची एक विशेष महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये बीड जिल्हा लोकशाही पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी युवा नेतृत्व असणारे पत्रकारांच्यासाठी दैनिक सरकारच्या वर्तमानपत्राच्या उत्कृष्ट लेखणीच्या माध्यमातून सर्वांना पत्रकारांना तसेच सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देणारे संपादक साहस आदोडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा मिळत आहेत.



तसेच डिजिटल मीडियाच्या प्रदेश अध्यक्षपदी दैनिक पोलखोलचे संपादक नितेश उपाध्य यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी आम्रपाली वावळकर तसेच डिजिटल मीडियाच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी उद्धव मोरे सर यांची निवड करण्यात आली. तसेच बीड जिल्ह्याचे तत्कालीन लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष झुंजार नेता चे उपसंपादक आमचे मित्र आत्माराम वावळकर यांची मराठवाडा लोकशाही पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली तसेच संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांची बीड जिल्हा संघटक म्हणून नियुक्त करून त्यांना तसे नियुक्त पत्र देण्यात आले या सर्वांचे अभिनंदन करण्यासाठी खास करून महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष हनीमा मॅडम शेख या खास पुण्यावरून बीड येथे उपस्थित आहेत तसेच महाराष्ट्राचे लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बेबी वैद्य साहेब यांनी सर्व पदाधिकारी यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी प्रतिष्ठित नागरिक तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड शहरातील भाजी मंडईत बहिण भावाचा पवित्र असा रक्षाबंधनाचा सणानिमित्त राखी खरेदी करतांना महिलांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. (छाया-कृष्णा शिंदे)

# स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ११वी विद्यार्थ्याच्या स्वागत समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

शैक्षणिक वर्ष २०२५ २६ इ ११वी कला विज्ञान विभागात ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया राबवली गेली. (एच एस व्ही सी विभाग ऑफलाईन प्रवेश पद्धती) स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि.८ ऑगस्ट पासूनइ ११ वी वर्गाच्या तासिका प्रारंभ झाले. यावेळी विद्यालयात प्रवेशित विद्यार्थाचे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.गुलाब पुष्प देवून सर्व विद्यार्थ्याचे स्वागत करण्यात आले.



यावेळी ,वेळपत्रक विविध सूचना शैक्षणिक सवलती यांची माहित विद्यार्थांना देण्यात आली. समारंभास प्राचार्य विठ्ठल काळे ,उपमुख्याध्यापक संदीप देशमुख, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे, डॉ.दीपक देशमुख यांची व्यासपीठावर उपस्थित होती समारंभाचे सूत्र संचलन प्रा संतोष जोशी प्रास्ताविक प्रा दीपक देशमुख आभार प्रदर्शन प्रा रत्नमाला सोनवणे यांनी केले.वरील समारंभास विद्यार्थी व प्राध्यापक गण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध स्पर्धाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष असून त्यांच्या समाजोध्दारक, न्यायप्रिय व लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण, शक्तीचा आदर नेतृत्वगुण मुल्याधिष्ठित विचारांची रजवणूक करण्यासाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण बीड विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील प्रसंगावर विविध स्पर्धाचे आयोजन करुन इयत्ता ०८ वी ते १२ वीतील नव युवक व युवतींना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार), निबंध स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य) या स्पधांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सर्व स्पर्धा दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत होणार आहेत. यामध्ये वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे ठिकाण तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड बीड, तर रांगोळी स्पर्धेचे ठिकाण तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे घेण्यात येणार आहेत.रांगोळी, वक्तृत्व,निबंध स्पर्धेतील प्रत्येकी प्रथम पारितोषिक रक्कम १०,०००/– व्दितीय पारितोषिक रक्कम ७,०००/– व तृतीय पारितोषिक रक्कम ५,०००/– व सन्मानपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.१) रांगोळी स्पर्धा: श्री. देशपांडे गोविद दिगांबर मो. ९०१११४४३१४ २) वक्तृत्व स्पर्धा : श्री. शुक्ला प्रसाद उमाकांत मो. ९१३०९५४०९५ ३ ) निवध स्पर्धा श्री शिनगारे विशाल मच्छिद्र मो. ९०२८८५६८०२ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त आयोजित विविध स्पर्धेत जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे, सहायक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

# १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वतयारी आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.



या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) शैलेस सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर संबधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाची रूपरेषा, आयोजनाची जागा, सुरक्षा व्यवस्था, शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, वाहतूक व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवस्था, वीज आणि पाणीपुरवठा याविषयी जिल्हाधिकारी श्री. जान्सन यांनी संबधित यंत्रणेस सूचना दिल्या.

१५ ऑगस्टच्या अनुषंगाने सांस्कृतीक कार्यक्रम जसे विद्यार्थ्याचे डान्स, देशभक्तीपर गीत, लोकगीत तसेच इतर कार्यक्रम आणि १५ ऑगस्टच्या कार्यक्रमासाठी आजी माजी स्वतंत्र सैनिक या सर्वांना कार्यक्रमासाठी अग्रहाचे निमंत्रण देऊन त्यांची एकाच सोयीने बैठक व्यवस्था करावी असेही श्री. जॉन्सन यांनी या बैठकीत सूचित केले.जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित विभागांना परस्पर समन्वय साधून वेळेत तयारी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी जनजागृती कार्यक्रम राबवण्याचेही निर्देश दिले.

शासनाच्या सूचनांनुसार १५ ऑगस्टचा शासकीय कार्यक्रम साजरा करण्यात येणार असून, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

# परंपरेला आधुनिकतेची जोड देणारी व व्यावसायिक संधी निर्माण करणारी कार्यशाळा–डॉ.दीपाताई क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील गृहविज्ञान विभागाच्यावतीने रक्षाबंधन या सणाचे औचित्य साधून एकदिवशीय राखी बनवणे कार्यशाळा दिनांक ०४/०८/२०२५ रोजी आयोजीत करण्यात आली होती.ही कार्यशाळा घेण्यामागचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना भारतीय परंपरेचे महत्व समजून रक्षाबंधना विषयी पार्श्वभूमी व भावनिक मुल्य समजेल. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल व आपली हस्तकला विकसीत करता येईल. स्वतःच्या हाताने वस्तु तयार केल्याने आत्मविश्वास वाढेल व समाधान मिळेल. सामुहिकरित्या काम करण्याचे महत्व व इतरांबद्दल आदराची भावना वृध्दींगत होईल अशा विविध उद्देशांचा विचार करण्यात आला व यशस्वी झाला. नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या नाविन्यपूर्ण राख्यांचे कौतुक केले.



# शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे फुंकले रणशिंग!

## शिवसैनिकांनो, आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी मंत्री ना. उदय सामंत

## शिवसेना नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आढावा बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा. तळागाळात जाऊन संघटना बांधणी करून पक्ष मजबूत करा. गरज पडेल तिथे आवाज द्या, अगदी शाखेच्या उदघाटनासाठी देखील आम्ही येऊ. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब आपल्यासोबत पूर्ण ताकदीने आहेत. असा विश्वास देत महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत साहेब यांनी बीड शिवसैनिकांमध्ये प्रचंड जोश निर्माण केला. काल दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, शिवसेना उप नेते माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्याकडून बीड जिल्ह्याचा आढावा शिवसेना नेत्यांसमोर सादर करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात आले. तसेच शिवसेना नेत्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी मुक्तसंवाद साधत सर्व समस्या जाणून घेत त्यांना आम्ही तुम्हाला ताकद देतो, तुम्ही संघटना मजबूत करा, सदस्य नोंदणीवर अधिक काम करा, स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकला पाहिजे. असा ठणठणीत आदेश मंत्री ना. उदय सामंत यांच्यासह शिवसेना नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले.



पक्षसंघटनेच्या कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही- संजय मोरे

विधानसभा निवडणुकीच्या भरीव यशानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महत्वपूर्ण टप्पा असून पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्याकरिता सदस्य नोंदणीवर अधिक काम करने गरजेचे आहे. पक्षसंघटनेच्या कामात किंचितही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही असे शिवसेना सचिव संजय मोरे यांनी आढावा बैठकीत पदाधिकाऱ्यांना ठणकाउन सांगितले.

एकनाथजी शिंदेसाहेब सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव असणारे नेते- भाऊसाहेब चौधरी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवणारा नेता आहे, कार्यकर्त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारा नेता आहे. स्व बाळासाहेब ठाकरे आणि आनंदजी दिघे साहेबांच्या संस्काराची शिदोरी घेऊन शिंदे साहेब महाराष्ट्र हितासाठी अहोरात्र धडपड करतायत. यामुळे आपल्याला देखील शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्ष संघटन वाढवावे लागणार आहे. असे शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गंगापूर - ॲड. अनिकेत सावंत यांची महिला व बालविकास अधिकारीपदी निवड



गंगापूर दि.१२: येथील ॲड. अनिकेत सावंत यांची महिला व बालविकास अधिकारीपदी निवड झाली आहे. महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ७ ऑगस्ट रोजी जाहीर झाला. या निकालात ड. सावंत यांनी यश संपादन करत अधिकारीपद मिळवले. ॲड. अनिकेत सावंत हे ॲड. सुनील सावंत यांचे चिरंजीव असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## श्री.स.भु.प्रशाला बालानगर येथे हर घर तिरंगा अभियान अंतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन



बिडकीन दि १२ पैठण तालुक्यातील श्री स.भु.प्रशाला बालानगर येथे मा.शिक्षणाधिकारी(माध्य.) जि.प.छा. संभाजीनगर यांच्या आदेशानुसार,शालेय समिती अध्यक्ष सत्यनारायणजी सोनी व प्रशालेचे मुख्याधापक आर बी गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार हर घर तिरंगा अभियानअंतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले,जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती जागृत रहाव्यात व देशभक्तीची भावना कायमस्वरूपी राहावी या उद्देशाने घर घर तिरंगा रॅलीत वर्ग- ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा,हर घर स्वच्छता,स्वतंत्र का उत्सव,स्वच्छता के संगइत्यादी घोषवाक्यांचा जयघोष केला.याप्रसंगी प्रशालेचे सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर सहकारी व सर्व विद्यार्थी रॅलीमध्ये सहभागी झाले.सदर रॅलीचे आयोजन क्रीडाशिक्षक संतोष शिंदे, पंकज ,कसबेसर,फिरोज पटेल यांनी केले

## नितिन पात्रे व गणेश चव्हाण यांची मुप्टा शिक्षक संघटनेच्या पैठण तालुका अध्यक्ष व उपाध्यक्ष पदी निवड





बिडकीन दि १२ ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सृजन प्राथमिक शाळेतील सहशिक्षक नितिन पात्रे यांची मुप्टा शिक्षक संघटनेच्या पैठण तालुका प्राथमिक विभागाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. व एक्सलंट पब्लिक स्कूलचे संस्थापक सचिव गणेश चव्हाण यांची उपाध्यक्ष पदी नियुक्ती मुप्टा शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव सुनील मगरे व संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या निर्णया नुसार करण्यात आली. यांच्या सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांना ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या या निवडी बद्दल शिक्षक व सहकाऱ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सोयगाव नगरपंचायत तर्फे शहरात तिरंगा रॅली काढून हर घर तिरंगा मोहिमेची जनजागृती



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट - शासनाच्या निर्देशाप्रमाणे सोयगाव नगरपंचायत कार्यालयामार्फत मुख्याधिकारी संभाजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार रोजी संपूर्ण शहरात तिरंगा रॅली काढून हर घर तिरंगा मोहिमेचा प्रचार,प्रसार व जनजागृती करण्यात आली.यामध्ये नगरपंचायतचे अधिकारी,कर्मचारी, स्थापत्य अभियंता अभिजीत सहाने,लेखापाल स्वप्नील सुकटे,वरिष्ठ लिपिक गोरखनाथ घाडगे,लिपिक समाधान गायकवाड,राजेश मानकर,शिपाई सारंग बागले,शहर समन्वयक दिनेश हिवाळे, सीएलटीसी सुरज चव्हाण,सुमित मोरे,पाणीपुरवठा कर्मचारी भगवान पगारे,सुरेश महाले, सुरेश चौधरी यांच्यासह शहरातील इतर नागरिक देखील उपस्थित होते.

## स्कोडा ऑटो ने कायलॅक, कुशक आणि स्लाव्हियाच्या मर्यादित आवृत्त्यांसह २५ वा वर्धापन दिन केला साजरा

छत्रपती संभाजीनगर, १२ ऑगस्ट २०२५ : भारतात २५ व वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वर्षे साजरी करत, स्कोडा ऑटो इंडिया ने त्यांच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या मॉडेल्सच्या मर्यादित आवृत्त्या सादर केल्या आहेत: कायलॅक, कुशक आणि स्लाव्हिया या विशेष, मर्यादित-असलेल्या आवृत्त्यांमध्ये विशिष्ट डिझाइनमध्ये सुधारणा केली आहे आणि प्रीमियम वैशिष्ट्ये आहेत, तसेच जे या खास टप्प्याला आणि ब्रँडच्या भारतीय बाजारपेठेतील सततच्या वचनबद्धतेला प्रतिबिंबित करते. या मर्यादित आवृत्त्या कुशक आणि स्लाव्हिया साठी मोंटे कार्लो, आणि कायलॅक साठी प्रेस्टीज आणि सिग्नेचर+ सारख्या विद्यमान हाय-स्पेक ट्रिम्सवर आधारित आहेत. स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, आम्ही भारतात स्कोडा ऑटोची २५ अविश्वसनीय वर्षे साजरी करत आहोत, ज्यात कायलॅक, कुशक आणि स्लाव्हिया यांच्या मर्यादित आवृत्तींचा समावेश आहे. या विशेष आवृत्त्या आमच्या चाहत्यांना लक्षात घेऊन डिझाइन केल्या आहेत.

## जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेची कथा 'अभंग तुकाराम'

छत्रपती संभाजीनगर - मराठी जनमानसासाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची 'ज्ञानेश्वरी' आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांची 'अभंग गाथा' याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. माऊलींच्या ज्ञानेश्वरीने महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचा पाया रचला, आणि जगद्गुरूंच्या अभंगांनी त्याच्यावर कळस चढवला. तुकोबारायांची ही अभंग गाथा तत्कालीन समाजव्यवस्थेने लादलेल्या जलदिव्यातून तावून सुलाखून निघाली आणि आजही आपल्या जीवनाचा भक्कम पाय म्हणून उभी आहे. आजही मराठी लोकांच्या वापरात या गाथेतल्या अभंगाची चरणे, म्हणी, वाक्प्रचार या स्वरूपात आपल्याला ऐकू येतात. एकूणात रोजच्या जगण्यात आज ३५० वर्षांनंतरही संत तुकाराम आपल्या या अजरामर रचनांमधून वास्तव्य करताना आपल्याला दिसतात. जगद्गुरूंचे हे तत्वज्ञान नवीन पिढीपर्यंत नेण्यासाठी प्रसिद्ध दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर 'अभंग तुकाराम' हा नवा कोरा चित्रपट ७ नोव्हेंबरला घेऊन येत आहेत.

### नावात बदल

माझे पूर्वीचे नाव मंजुषा भास्कर पत्की असून माझे सध्याचे नाव मंजुषा भास्करराव पत्की आहे. करीता हे प्रगटन देण्यात येत आहे

### नावात बदल

मी मंगेश संभाजी चौधरी रा.सोयगांव, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून, माझा मुलगा नामे विवेक मंगेश चौधरी हा आहे.

तसेच त्याची जन्म दिनांक ३०/८/२०२१ अशी असून त्याच्या जन्मदाखल्यावर नजर चुकीने विवेक मंगेश चौधरी असे झालेले आहे.

परंतु त्याचे खरे नाव क्रिष्णा मंगेश चौधरी असे आहे.

जे नजर चुकीने जन्म दाखल्यावर झालेले नाव विवेक मंगेश चौधरी हे नाव दुरुस्ती करून क्रिष्णा मंगेश चौधरी असे ठेवण्यात येत आहे.

**माझा पत्ता**

**मंगेश संभाजी चौधरी रा.सोयगाव तालुका सोयगाव,जिल्हा छत्रपती संभाजीनगर- ४३११२० मो.न.८८९८९८५२८५**

# जिव गेला तरि चालेल पण गायरान व वन जमिन सोडणार नाहीत

## सोयगावात गायरान व वन धारक शेतकरी आक्रमक



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ ऑगस्ट

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सोमवारी दुपारी एक वाजता भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतिने गायरान व वन धारक शेतकरी,शेतमजूर,ऊस तोड कामगार, यांच्या विविध मागण्यासाठी तास भर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलन कर्त्यांनी विविध मागण्याचे निवेदन नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांना दिले दरम्यान छत्रपतीसंभाजीनगरचे जिल्हाधिकारी यांनी जिल्हा अधिकारी यांनी १७ जुलै २०२५ रोजी आदेश काढून गायरान व वन जमिन खाली करण्याचे आदेश अधिकारया ना दिले होते.यामुळे गायरान व वन जमिन कसणाराया मध्ये दाहशतीचे व चितेचे वातावरण तयार झाले आहेत.त्यामुळे सोमवारी आंदोलन कर्त्यांनी शासनाच्या निषेध नोंदवीत रस्ता रोको आंदोलन केले.दरम्यान आंदोलन कर्ते रस्ता रोको झाल्या वर दुपारी दोन वाजता पुन्हा तहसील कार्यालयात धडकले यावेळी कॉम्रेड अभय टाकसाळ,कोम्रेड सय्यद अनिस यांनी आंदोलन कर्त्यांच्या वतीने नायब तहसिलदार संभाजी देशमुख यांच्याशी विविध मागण्यांसाठी चर्चा केली गेल्या अनेक वर्षी पासून हे लोक गायरान व वन जमिन कसून आपला व आपल्या कुटूंब्याच्या उद्धार निर्वाह करतात. आम्ही गायरान व वन जमिन सोडणार नाहीत आमचा जिव भीं गेला तरी चालेल अशा निर्धार त्यांनी केला.गायरान व वन जमिन खाली करण्याचा आदेश तत्काळ मागे घ्यावा. गायरान व वन जमिन नावावर करा,ऊस तोड कामगारांना ऊस तोड़ी च्या ठिकाणी निवासाची व्यवस्था करण्यात यावी, ऊस तोड कामगारांच्या मुलांना निवासी शाळेची व्यवस्था करा. सोयगाव तालुक्यात मजबूत रस्ते तयार करा.ग्रामिण भागात बसचे फेरया वाढविण्यात यावे.बे घरांना घरे देण्यात यावे,ग्रामिण भागात मनरेगाचे कामे सुरू करा.मजूरांच्या मजूरीत वाढ करा.अश्या मागण्याचे निवेदन नायब . तहसिलदार संभाजी देशमुख यांना देण्यात आले.यावे वेळी अण्ड कॉम्रेड अभय टाकसाळ,कॉम्रेड सय्यद अनिस, कॉम्रेड त्रिबक शेजूळ, कॉम्रेड प्रताप चव्हाण, यांनी मार्गदर्शन केले. एक तास सुरू असलेल्या या रस्ता रोको मुळे वाहाण्याचे खूप मोठे रागा लागल्या होत्या.पोलीस प्रशासनाने मोठा बंदोबस्त ठेवला होता.यावेळी असलम मिर्झा,अरुण राठोड, भरत वाघ कलीम तडवी, सुभाष राठोड, सुनिता राठोड, शेख अजिम, सौरभ पवार, शेख नदिम, कैलास चव्हाण, तमिजा तडवी, लालचंद चव्हाण, संतोष गायकवाड, जयराम पवार, भिकन जाधव, विश्वनाथ जाधव, मोहन चव्हाण, भागवत करपे, सय्यद भिकन, रमेश सोनवणे, शेख कासम, समाधान गायकवाड, यशवंता गायकवाड, श्रावण गायकवाड आदि या रस्ता रोको आंदोलनात उपस्थित होते.

## शिक्षक-पालक मेळाव्यात गुणवंत व खेळाडू विद्यार्थ्यांचा गौरव



तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.१२ ऑगस्ट - जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात शिक्षक-पालक व विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. योगीराज सोमवंशी उपस्थित होते. यावेळी इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थी ऋतुजा अकोलकर, अदनान बागवान, प्रगती चव्हाण, भक्ती बोडखे, वेदिका चव्हाण, अंजली चव्हाण, मयूर पल्हाळ, दर्शन रोजेकर, कल्पेश आडे यांचा पालकांसहित सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यालयातील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भनु चव्हाण व रूपाली शिंदे यांचा देखील सत्कार झाला.

पालकांना मार्गदर्शन करताना सागर जाधव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक व पालकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पालकांनी वेळोवेळी शाळेच्या शिक्षकांच्या संपर्कात राहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला महिला व पुरुष पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे यांनी केले. सूत्रसंचालन योगेश जंजाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक जाधव यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जगमोहन मुंडवाडकर, ज्ञानेश्वर नायकुडे, भारत पवार, दत्तात्रय गायके, लक्ष्मण पांडव, भगवान म्हैसमाळे, योगेश कुमावत, सुनिता दाबके, बाविस्कर, सीमा राठोड, सुरज हिरे, सुभाष जाधव, संतोष आग्रे यांनी सहकार्य केले.

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची कट्यारे यांची मागणी




तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ :- तीर्थक्षेत्र पैठण शहरातील सर्वच भागात सध्या मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून हे कुत्रे जागोजागी नागरिकांचे लचके तोडत आहे. स्वच्छता नसल्याने विविध भागात साचलेल्या कचऱ्याची दुर्गंधी त्याठिकाणी जमा झालेले मोकाट जनावरे आणि कुत्रे नागरिकांना लक्ष करत आहेत. पैठण नगर परिषदेकडून मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा नसता तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन काँग्रेस पक्षाचे गटनेता तथा माजी नगरसेवक हस्नोद्दीन कट्यारे यांनी न.प ला दिले आहे.

शहरात सगळीकडे नागरिकांना मोकाट कुत्र्यांनी हैराण केले असून नाथ मंदिर परिसर, उद्यान रोड, कोर्ट रोड, बसस्थानक परिसर, इंदिरानगर,कावसन, लक्ष्मीनगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, झेडपी स्कुल, भाजी मार्केट परिसर, नेहरू चौक, ग्रीन चौक, मौलाना दर्गा रोड,सादात मोहल्ला, संजरपुरा, पावर हाऊस, नागघाट परिसर आदी ठिकाणी मोकाट कुत्रे हे लहान बालकांना तसेच महिला भगिनी, वृध्द आणि नागरिकांना चावा घेत असून यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. या गंभीर प्रश्नाबाबत कट्यारे यांनी मंगळवारी नागरिकांसह नगर परिषदेला भेट देत या प्रकरणी जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी यांच्या कडे तक्रार करणार असल्याचे कट्यारे बोलले

.तीर्थक्षेत्र तसेच पर्यटन नगरीत मोकाट कुत्रे आणि जनावरे यांचा नगर परिषदेने तात्काळ बंदोबस्त करावा नसता न.प. विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन काँग्रेस पक्षाचे गटनेता तसेच माजी नगरसेवक हस्नोद्दीन कट्यारे यांनी नगर परिषदेला दिला आहे.

## कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये स्वादुपिंड ट्रान्सप्लांटवर विशेष कार्यक्रम



छत्रपती संभाजीनगर- कमलनयन बजाज हॉस्पिटल हे स्वादुपिंड ट्रान्सप्लांटसाठी अधिकृत परवाना मिळवणारे मराठवाड्यातील पहिले रुग्णालय ठरले आहे. या ऐतिहासिक महत्वाच्या टप्प्याचे औचित्य साधून एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आ.

यावेळी स्वादुपिंड ट्रान्सप्लांटविषयी शास्त्रीय, वैद्यकीय आणि नैतिक बाजूंवर सखोल चर्चा होणार असून, तज्ज्ञ डॉक्टर आपले अनुभव आणि दृष्टिकोन मांडण्यात आले. ज्येष्ठ उद्योजक तथा सीएमआयए चे अध्यक्ष श्री. उत्सव माछर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तर घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, एमजीएम रुग्णालयाचे सीईओ डॉ. प्रवीण सूर्यवंशी, आयएमए चे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर आणि आयएमए चे सचिव डॉ. योगेश लक्कस हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या वेळी

डॉ. अनुराग श्रीमल - प्रख्यात मल्टीऑर्गन ट्रान्सप्लांट सर्जन, डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस - मुख्य कार्यकारी अधिकारी, कमलनयन बजाज हॉस्पिटल, डॉ. अजय वसंत रोट्टे - वैद्यकीय संचालक, डॉ. मिलिंद वैष्णव - ट्रान्सप्लांट विभाग प्रमुख, डॉ. अर्चना सरडा - वरिष्ठ मधुमेह तज्ज्ञ व उडान एनजीओच्या संस्थापक प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

यावेळी प्रख्यात मल्टीऑर्गन ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अनुराग श्रीमाल स्वादुपिंड ट्रान्सप्लांट विषयी सखोल माहिती देणार आहेत. तसेच डॉ. शिवाजी तौर, डॉ. गौरव रत्नपारखी, डॉ. अनिरुद्ध गोपनपल्लीकर आणि डॉ. अर्चना सारडा आपले मनोगत व्यक्त केले.

कमलनयन बजाज रुग्णालयाचे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडीस यांच्या अथक प्रयत्नातून अनेक जीव वाचवणारे स्वादुपिंड प्रत्यारोपण हे त्यांच्या दूरदृष्टीने आणि मानवतेच्या भावनेने आखलेल्या उद्दिष्टांची पूर्ती दर्शवते. आपल्या माध्यमातून या वैद्यकीय प्रगतीची माहिती जनतेपर्यंत पोहोचेल, ही अपेक्षा आहे.

## कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,सोयगाव यांची २७ वी वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ ऑगस्ट

येथील कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,सोयगाव यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.६ बुधवार रोजी सकाळी ९:०० वाजता व्यंकटेश कॉम्प्लेक्स (छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ) संस्थेच्या वरच्या मजल्यावर सोयगाव येथे संस्थेचे चेअरमन दिलीप राजमल बिर्ला यांच्या अध्यक्षतेखालील ठेवण्यात आली होती.

यावेळी संस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांच्या हस्ते कै.बाबुरावजी काळे व सरस्वती लक्ष्मी माता यांच्या प्रतिमेस पूजन करून सभेला सुरुवात करण्यात आली.यावेळी जेष्ठ सभासद तुकाराम कळवत्रे,रमेश जावळे,यांनी पतसंस्थेविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. पतसंस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांनी आलेल्या सर्व सभासद,प्रमुख पाहुणे,विविध पतसंस्थेचे सभासद,कर्मचारी, यांचा गुलाब फूल देऊन स्वागत करण्यात आले.तसेच यावेळी पतसंस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांनी पतसंस्थेविषयी कर्ज वाटप,वसुली,वेळेवर कर्ज भरणा करून संस्थेला वेळेवर सहकार्य करावे अशा अनेक विषयी सभासद यांना मार्गदर्शन केले.व

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला,व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,संचालक दत्तात्रय देसाई,भगवान पाटील,सुलेमान उस्मान शेख,कृष्णा कुर्लेकर,बाबुराव चव्हाण,राजेश एलीस,सह बन्सीलाल बेडवाल,भैरवनाथ पतसंस्थेचे मॅनेजर धनराज औरंगे,गोकुळ रोकडे,स्वामी समर्थ पतसंस्थेचे सुनील शेंगदाणे,देविदास बैरागी,तिरुपती अर्बनचे मॅनेजर विकास देसाई,विशाल घन,विष्णू गव्हाणे,सतीश मंडवे,राजू औरंगे,सह सभासद उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ सभासद रमेश जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन चेअरमन दिलीप बिर्ला यांनी केले.व पतसंस्थेचे मॅनेजर सिताराम गोतमारे कॅशियर कृष्णा शेवाळकर यांनी परिश्रम घेतले.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ५५१/२०२५ पु. ता. दि १८/०९/२०२५

अर्जदार : १) सिमा भ्र. रामदास वैष्णव, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. २) अजय रामदास वैष्णव, वय २१ वर्ष, धंदा शिक्षण, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ३) पियुष रामदास वैष्णव, वय १९ वर्ष, धंदा शिक्षण, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) मंगलबाई भिकनदास वैष्णव, वय ७० वर्ष, धंदा घरकाम, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. एन. साबणे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ व ३ यांची आई असुन अर्जदार क ४ हि अर्जदार क १ ची सासु व अर्जदार क २ व ३ यांची आजी आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ व ३ यांचे वडील आणि अर्जदार क ४ चा मुलगा नामे रामदास भिकनदास वैष्णव हे दि. ०७/०१/२०२३ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयत रामदास भिकनदास वैष्णव यांचे वडील म्हणजेच अर्जदार क १ चे सासरे व अर्जदार क २ व ३ यांचे आजोबा आणि अर्जदार क ४ चे पति नामे भिकनदास द्वारकादास वैष्णव हे देखील दि. १७/०५/२००२ रोजी मयत झालेले आहे. मयत रामदास भिकनदास वैष्णव यांना अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ हे मुले आणि अर्जदार क ४ हि आई या नात्याने कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत रामदास भिकनदास वैष्णव यांना अर्जदार क १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत रामदास भिकनदास वैष्णव यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतवा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि.०८/०८/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.आर.एस. तापडीया) साहेब क. स्तर यांचे कोर्टात**

दि.किरकोळ अर्ज क. ४०२/२०२५

अर्जदार : १. अब्बास पि. कादर शेख वय-५८ धंदा- मजुरी रा. म्हाडा कॉलनी हिवरखेडा रोड ता.-कन्नड जि. औरंगाबाद २. अशफाक पि. कादर शेख वय-५५ धंदा- मजुरी रा.- स्नेहनगर, कन्या शाळेजवळ कन्नडता. कन्नड जि. औरंगाबाद ३. गुस्ताक पि. कादर शेख वय-४९ धंदा- मजुरी रा.- म्हाडा कॉलनी, हिवरखेडा रोड कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. नसीमाबानो भ्र. मोईन शेख वय-७५ धंदा- घरकाम रा. अंधानेर ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. तस्लिमा भ. असद पठाण वय-४८ धंदा-घरकाम रा- कृष्णा कॉलनी लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६. सलमाबानो भ्र. मोसीनखान पठाण वय-४७ धंदा-घरकाम रा- घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद

-: विरुध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्जः- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ते ६ यांचे वडील मयत नामे कादर पि. रज्जाक शेख यांचा मृत्यु दि. २०/०४/२०११ रोजी मौजे कन्नड ता. कंन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसुन अर्जदार यांची आई नामे शमीम कादर शेख हिचा मृत्यु देखील दि. २६/०३/२०२५ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयतास केवळ अर्जदार क. १ ते ६ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत कादर पि. रज्जाक शेख यांचे वारसांना शासकीय, निमशासकीय योजनेंचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,

मयत कादर पि. रज्जाक शेख यांचे वारसांना शासकीय, निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हेच मयत्ताचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता थाहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यारा ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ११/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा.श्री.व्ही.डी. पाटील, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयातुन**

पु. ता. ४/९/२०२५

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ३७८/२०२५

अर्जदार : १) फकीरराव मुरलीधर निकम वय-६४ वर्षे धंदा-मजुरी रा. दिगर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) येणुबाई भिकन बिरारे वय-७४ वर्षे धंदा-घरकाम रा. घाटशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३) संगिता संतोष काकुळते वय-५२ वर्षे धंदा-घरकाम रा. दहिगाव ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४) सुमनबाई राजेंद्र सोनवणे वय-४५ वर्षे धंदा-घरकाम रा.हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५) वंदनाबाई अशोक नवसरे वय-५९ वर्षे धंदा-घरकाम रा.हेंद्रुन ता.जि.धुळे

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकिल ॲड. आर.बी. सातदिवे यांचे मार्फत मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार कं. १ ते ५ यांचे वडील नामे मुरलीधर आश्राबा निकम हे होते ते हतनूर येथील रहिवाशी होते ते दिनांक २६/११/२००२ रोजी मयत झाले आहे. त्यांची पत्नी नामे गंगुबाई मुरलीधर निकम या होत्या त्या देखील दिनांक ०९/०३/१९९८ रोजी हतनूर ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहेत त्यांना अर्जदार कं. १ हा मुलगा व अर्जदार कं. २ ते ५ मुली असून आहे. मयत मुरलीधर आश्राबा निकम म्हणजेच अर्जदाराचे वडील यांच्या नावावर असलेल्या मिळकती व ईतर शासकिय व निमशासकिय महसुल दप्तरी वारसाची नोंद घेण्याकरिता तसेच विविध शासकिय व निमशासकिय लाभघेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत मुरलीधर आश्राबा निकम व मयत गंगुबाई मुरलीधर निकम यांचे अर्जदार कं. १ ते ५ हे कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त मयत मुरलीधर आश्राबा निकम व मयत गंगुबाई मुरलीधर निकम यांना ईतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबात कोणासही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार यांचे हक्कात अर्जदार कं. १ ते ५ हे मयत मुरलीधर आश्राबा निकम व मयत गंगुबाई मुरलीधर निकम यांचे वारस असल्याचे अर्जदार कं. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक -११/०८/२०२५

आदेशावरून

क. लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख...

# पवारांचे पोकळ 'पंच'तंत्र!

लाल मातीतल्या किंवा आखाड्यातल्या कुस्तीचा जमाना आता राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर मागे पडत चालला असल्याने या कुस्तीच्या खेळाचे सारेच नियम नव्या मॅटवरच्या कुस्ती स्पर्धेत चालत नाहीत. आखाड्यातल्या कुस्तीत, धोबीपछाडसारखे डावपेच खेळून प्रतिस्पर्ध्याची पाठ जमिनीला लावणारा पैलवान विजयी ठरत असला, तरी मॅटवरच्या, नव्या जमान्यातल्या कुस्तीत एवढा एकच नियम विजयासाठी पुरेसा नसतो. या दोन्ही प्रकारच्या कुस्तीचे नियम वेगळे असतात, खेळायची पद्धतही वेगळी असते, विजयाचे निकष वेगळे असतात आणि मैदानही वेगळे असते. मॅटवरची कुस्ती किंवा फ्रीस्टाईल कुस्ती बंदिस्त मैदानात मॅटवरच खेळली जाते आणि त्याची आंतरराष्ट्रीय मानके ठरलेली असतात, ती गुणांच्या आधारावर खेळली जाते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही लाल मातीतील कुस्तीगीरांच्या संघटनेचे नेतृत्व केले होते. बहुधा त्यामुळेच धोबीपछाड हा त्यांचा आवडता डाव असल्याची चर्चा राजकारणाच्या आखाड्यातही होत असते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना, दूरदर्शन या सरकारी चित्रवाणीवरील एका मुलाखतीत स्वत: पवार यांनीही त्याची तशी कबुली दिली होती आणि लोकांच्या अशा समजुतीची आपण मजा अनुभवत असतो, असेही तेव्हा त्यांनी अभिमानाने सांगितले होते. त्या मुलाखतीनंतर शरद पवार यांचे राजकारण अनाकलनीय आहे असा समज दृढ होऊ लागला. त्यांच्या राजकारणाचा हा प्रवास, आजही, त्यांच्या वयाच्या या टप्प्यावरही तशीच मजा अनुभवत सुरू असल्याने, अशी गंमत करणे हा आपल्या राजकारणाचाच एक भाग आहे, असाही त्यांचा समज असावा. राजकारणाच्या उमेदीच्या काळात याच राजकारणाचा वापर करून त्यांनी राजकारणाचा आखाडा गाजविला आणि त्यांच्या अनाकलनीय राजकारणाचा फटका बसलेल्या अनेकांना, जमिनीला पाठ लागेपर्यंत पराभव झाल्याचे लक्षातही आले नाही. धोबीपछाड देऊन प्रतिस्पर्ध्यास आखाड्याबाहेर घालविण्याचे त्यांचे कौशल्य तेव्हा अनेकांनी मान्य केल्याने, आजही तीच स्थिती असावी असा काहींचा समज असला, तरी आता कुस्तीचे नियमच बदलले आहेत. लाल मातीच्या आखाड्यातल्या कुस्तीचे नियम आता मॅटवरच्या कुस्तीत चालत नाहीत आणि आखाड्यातील कुस्तीच्या नियमांतील लवचीकपणादेखील या प्रकारात खपवून घेतला जात नाही. पवार यांनी दीर्घकाळ राजकारणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील अनेक खेळांच्या संघटनांचेही नेतृत्व केल्याने, त्यांच्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यास खेळविण्यावरही बराचसा भर असे. मात्र, गेल्या सुमारे दशकभरापासून पवारांच्या आवडत्या कुस्ती प्रकाराचे डावपेच कालबाह्य झाले असून राजकारणाच्या आखाड्यातील कुस्तीतही त्यांच्यासमोर शड्डू ठोकून उभे राहण्याची उमेद असलेले नवे कसलेले मल्ल आता प्रतिस्पर्धी गटांतही तयार झाल्याने पवारांची सद्दी संपत चालली आहे. कुस्तीच्या खेळात प्रतिस्पर्ध्यावरील पकड मजबूत असावी लागते, हे पवारांना पूर्वी चांगले ठावूक होते. आता मात्र त्यांचीच पकड सैल होत चालल्याने, कुस्तीच्या आखाड्यात उतरल्यानंतरही धरसोडीचाच प्रकार अधिक होत असून यातही त्यांना बरेचदा माघारच घ्यावी लागल्याने, तडजोडीची कुस्ती किंवा लुटुपुटूची कुस्ती खेळून मैदानात टिकून राहण्यासाठी त्यांची सुरू असलेली धडपड आता स्पष्ट दिसू लागली आहे. नव्या नेतृत्वाला संधी देऊन पक्षावरील ताबा सोडून केवळ सल्लागाराची भूमिका बजावण्याचा अजित पवार यांनी त्यांना दिलेला सल्ला धुडकावूनही त्यांनी पक्षावर ताबा टिकविण्यासाठी घेतलेल्या भूमिकेचे तेव्हा काहीसे कौतुक झालेदेखील असेल, पण त्यापायीच पक्ष फुटला आणि तडजोडीच्या राजकारणासाठी धरसोडीचे अनेक डाव खेळूनही यशस्वी ठरले नाहीत हेदेखील स्पष्ट झाले. सत्ता हे कोणाच्याही राजकीय कारकीर्दीचे अंतिम उद्दिष्टच असते. दीर्घकाळ राजकारणात राहून वेगवेगळी सत्तापदे उपभोगलेले शरद पवार हे त्यास अपवाद असतील असेही नाही. कदाचित त्यामुळेच सत्तेच्या सान्निध्यात राहण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडींपायी जुन्या कुस्तीचे लवचीक नियम अधिक लवचीक करण्याची वेळही त्यांच्यावर अनेकदा आली. भाजपासोबत सत्ता स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे पितळ खुद्द अजित पवारांनीच अनेकदा उघडे पाडल्याने, पवारांच्या जुन्या, अनाकलनीय राजकारणातील त्यांनाच वाटणारी गंमतही आता सपक झाली आहे आणि त्यांच्या राजकारणाचा बराचसा भाग विनोदी वाटू लागला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणुकीत मत चोरी झाल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाच्या नावाने बोटे मोडण्यास सुरुवात केल्यावर, राजकारणातील सर्वांत मोठा ॲटम बॉम्ब फुटल्याच्या अपेक्षेने पुढच्या घडामोडींकडे पाहणाऱ्यांचा बराचसा हिरमोड झाल्याचे लक्षात येताच शरद पवार पुढे सरसावले. एखादी नवी, बिनबुडाची लोणकढी पुढे आणली तर सध्याच्या संशय निर्माण करण्याच्या वातावरणात आपलेही घोडे पुढे दामटणे शक्य होईल, असा प्रयत्न शिवसेनेच्या उबाठा गटाचे खासदार संजय राऊत नेहमीच करत असतात. त्याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नसले किंवा त्यांच्या त्या प्रयत्नांतून साध्या लवंगी फटाक्याचाही आवाज निघत नसला, तरी बातम्यांचा रतीब टाकण्यासाठी भुकेल्या वाहिन्यांची भूक भागविणारा चटकदार मसाला मिळत असल्याने वाहिन्यांवर मात्र अशा प्रयत्नांना सर्वांत मोठ्या बातमीची जागा मिळते हे स्पष्ट झाले आहे. राहुल गांधी यांना त्या कथित ॲटम बॉम्बची कल्पनादेखील संजय राऊत यांच्या तंत्रावरूनच सुचली असावी, असे एक सूचक विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्यावर पवार यांनाही त्याचे अनुकरण करण्याची अनावर इच्छा झाली असावी. अन्यथा, शेंडाबुडखा नसलेली एक लोणकढी बातमी सोडून त्यांनी राहुल गांधींच्या फुसक्या ॲटम बॉम्बच्या चर्चेची हवा काढून घेण्याचा प्रयत्न केलाच नसता. पवार यांच्या अनाकलनीय राजकारणाची पूर्वीची सद्दी केव्हाच संपल्याने, ते स्वतः अजूनही त्याची कितीही गंमत अनुभवत असले, तरी त्याचेदेखील गांभीर्य आता राहिलेले नाही. मुंबईतील तेराव्या बॉम्बस्फोटाची अफवा पसरवून आपल्याच अनाकलनीय राजकारणाची गंमत अनुभवण्याचा त्यांचा प्रयत्न तेव्हा त्यांच्या जसा अंगाशी आला होता, तसाच भीमा कोरेगाव प्रकरणात नाहक काही जणांभोवती संशय पेरून गंमत अनुभवण्याचा प्रकार त्यांना फारसा पेलता आला नव्हता. हिंदू दहशतवादाचा भ्रम जनतेमध्ये पसरविण्याचा काँग्रेसच्या कटात सहभागी होण्याचा त्यांचा प्रयत्नही फारसा यशस्वी ठरला नव्हता. निवडणुकीच्या काळात दोघे जण आपल्याला भेटले व १६० जागांवर विजय मिळवून देण्याची हमी त्यांनी दिली, हा पवारांचा नवा 'पंच'देखील फुसका ठरला आहे. कुस्तीच्या खेळात पंच मारणे हा फाऊल समजला जातो. पवार यांनी ज्या कुस्तीच्या खेळाचे नेतृत्व केले, त्या खेळात तर लवचीक नियम असूनही पंच मारण्यास परवानगीच नाही. त्यामुळे आखाड्यातील कुस्तीत हा वेगळाच पंच मारण्याचा प्रयत्न म्हणजे फाऊल ठरला आहेच; पण त्यांच्या कालपरवापर्यंत अनाकलनीय वाटणाऱ्या राजकारणाचा फोलपणाही उघडा पडला आहे. जेव्हा प्रतिस्पर्धीच नसतो, तेव्हा एखादा मल्ल आपल्याच मस्तीत शड्डू ठोकत आखाड्यात उतरतो, पण तेव्हाच्या राजकीय आखाड्यातील तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. आता कुस्तीचे आव्हान स्वीकारणारेच नव्हे, तर आव्हान देणारे कसलेले आणि नव्या दमाचे मल्ल राजकारणात उतरलेले आहेत आणि जुना धोबीपछाडचा डाव कुचकामी ठरतो, हे त्यांनी सिद्धही केले आहे. निवडणुकीत विजय मिळवून देण्यासाठी दोघांनी आपली भेट घेतली, त्यांची आपण राहुल गांधींशी गाठ घालून दिली आणि अखेर दोघांनीही हा देकार नाकारला, हा त्यांचा बिनबुडाचा दावा बातम्यांसाठी भुकेल्या वाहिन्यांनी गांभीर्याने लोकांसमोर ठेवला, अपेक्षेप्रमाणे त्यांचा तो फटाकाही राहुल गांधी यांच्या फुसक्या बॉम्बसारखाच फुसका ठरला; तरीही पवारांपाठोपाठ जाग आलेल्या संजय राऊत यांनीही तसाच दावा केला आहे. म्हणजे, आता राऊत यांच्या रांगेत खुद्द राहुल गांधी आणि शरद पवारदेखील दाखल झाले आहेत, एवढेच! ▮

आंतरराष्ट्रीय

## बांगलादेश, म्यानमारमधील संकट वाढणार?

प्रा. जयसिंग यादव

२०२१ मध्ये झालेल्या उठावानंतर म्यानमार गृहयुद्धात बुडाला आहे. लष्करी जुंटा गटाला सत्तेवरून हटवण्यासाठी अनेक सशस्त्र गट लढत आहेत. गेल्या दोन वर्षांमध्ये जुंटाने देशाच्या जवळजवळ अर्ध्या भागावरील नियंत्रण गमावले आहे. तिथे जातीय बंडखोर सैन्य आणि प्रतिकार गट देशाचा एकामागून एक भाग ताब्यात घेत आहेत. दुसरीकडे, ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशमधील शेख हसीनांचे सरकार अराजकांनी उलथवून टाकल्यानंतर बांगलादेशमध्ये अराजकता पसरली. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार आतापर्यंत सत्तेत आहे. त्याने अवामी लीग आणि त्यांच्या सहयोगी पक्षांविरुद्ध सूड उगवण्याच्या कारवाया सुरू केल्या आहेत. कट्टरपंथी इस्लामिक शक्ती तिथे अधिक मजबूत झाल्या आहेत. युनूस सरकारने हसीना यांच्या काळात तुरुंगात असलेल्या दहशतवादी संघटनेच्या अन्सारुल्ला बांगला टीमचे प्रमुख जसीमुद्दीन रहमानीसारख्या कैद्यांना सोडले. लष्कराच्या दबावाला न जुमानता युनूस यांनी निवडणूक रोडमॅप जाहीर केलेला नाही. ५ ऑगस्ट रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुकांवर भाष्य केले; परंतु जर 'सर्व काही व्यवस्थित झाले' तर अशी 'जर, तर'ची भाषा त्यांनी वापरली. मुख्य निवडणूक आयुक्त एएमएम नसिरुद्दीन यांनी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या संसदीय निवडणुकांची पुष्टी केली; परंतु अनेक अडचणी पुढे केल्या. युनूस हे या मार्गातील सर्वांत मोठे अडथळे मानले जातात.

दोन महिन्यांपूर्वी लंडनमध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)चे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांच्याशी झालेल्या बैठकीत युनूस यांनी फेब्रुवारीच्या सुरुवातीला निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली होती; परंतु तोपर्यंत काही आवश्यक सुधारणा पूर्ण कराव्यात अशी अट घातली होती. यापूर्वी त्यांनी जून २०२६ मध्ये निवडणुका घेऊ असे भाष्य केले होते. अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून त्यांनी सत्ता घेताच तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे जाहीर केले होते; परंतु हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून कारभार हाती घेऊन एक वर्षाहून अधिक काळ झाला असला, तरी त्यांना आता खुर्चीचा मोह सुटत नाही, हे दिसते. युनूस जागावाटपावर 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी' (बीएनपी)शी जोरदार सौदेबाजी करत आहेत. शेख हसीना यांचे सरकार असताना 'बीएनपी' पक्षाच्या अनेक नेत्यांना न्यायालयाने देशद्रोही कारवायांबद्दल दोषी ठरवून शिक्षा दिली होती. अंतरिम सरकारच्या काळात या सर्वांची सुटका करण्यात आली. त्यात युनूस यांचा मोठा वाटा होता. त्यांना आता त्याची परतफेड हवी आहे. ३०० जागांच्या संसदेतील किमान ५० जागा 'जमात-ए-इस्लामी'साठी आणि तितक्याच जागा 'नॅशनल सिटिझन्स पार्टी'



(एनसीपी) आणि इतर लहान इस्लामिक पक्षांसाठी सोडाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. 'बीएनपी'ने पूर्वी 'जमात-ए-इस्लामी'शी युती केली होती; पण आता अनेक नेते स्वतंत्रपणे निवडणूक लढवू इच्छितात.

'जमात-ए-इस्लामी'चा इतिहास वादग्रस्त आहे. कारण त्यांनी १९७१ च्या मुक्ती युद्धात पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा दिला होता. त्यामुळे, अनेक 'बीएनपी' नेते त्यांच्यापासून दूर राहून आपली राष्ट्रवादी प्रतिमा मजबूत करू इच्छितात; परंतु 'जमात-ए-इस्लामी' आणि राष्ट्रवादी हे युनूसचे मोठे समर्थक आहेत. राष्ट्रवादीची स्थापना हसीना यांना सत्तेवरून काढून टाकणाऱ्या विद्यार्थी-युवा ब्रिगेडने केली होती. युनूस यांची महत्त्वाकांक्षा वाढली असून, त्यांना अध्यक्ष व्हायचे आहे. राष्ट्रपती बनण्यासाठी ते एक मजबूत युती तयार करू इच्छितात. अध्यक्षपदामुळे त्यांना दैनंदिन कारभाराच्या ताणाशिवाय धोरणांवर प्रभाव पाडण्याची संधी मिळेल. हसीना यांच्या कार्यकाळात त्यांच्याविरुद्ध खटले दाखल झाले होते. हे त्यांना भविष्यातील कायदेशीर कारवाईपासूनही मुक्त करेल; पण 'अवामी लीग'वर निवडणूक लढवण्यास बंदी घातली गेल्यास युनूस निष्पक्ष निवडणुका घेऊ शकतील का, हा प्रश्नच आहे. हसीना यांच्या कथित हुकूमशाही राजवटीच्या नावाखाली अवामी लीगला निवडणूक लढवण्यास बंदी घालणे म्हणजे १९८० च्या दशकात आणिबाणीमुळे काँग्रेसला निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यासारखेच असेल.

दुसरीकडे, म्यानमारची लष्करी सत्ता सांभाळणारे जुंटा घाईत आहेत. जुंटा प्रमुख वरिष्ठ जनरल मिन आंग ह्याईंग यांनी जुलैच्या अखेरीस आणिबाणी उठवली आणि डिसेंबर-जानेवारीमध्ये टप्प्याटप्प्याने राष्ट्रीय निवडणुका घेण्यास परवानगी दिली. २००८ च्या संविधानानुसार, आणिबाणी उठवल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे आवश्यक आहे. जुलैमध्ये राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा परिषदेने राज्य प्रशासन परिषद विसर्जित केली. त्या जागी राज्य सुरक्षा आणि शांतता आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याचे नेतृत्व ह्याईंग यांनी केले. ते कार्यवाहक अध्यक्षदेखील आहेत. 'द ग्लोबल न्यू लाईट ऑफ म्यानमार'मध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, हा आयोग संरक्षण, सुरक्षा आणि शांततेसाठी काम करेल आणि बहुपक्षीय लोकशाही निवडणुका सुनिश्चित करेल. या आयोगाकडे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायिक अधिकार असतील. ह्याईंग यांच्याकडे लष्करप्रमुख आणि कार्यवाहक अध्यक्षपद असल्याने हे बदल आंतरराष्ट्रीय समुदायाला आकर्षित करण्यासाठी केवळ एक देखावा आहे हे स्पष्ट आहे. जुंटा निष्पक्ष निवडणुका घेऊ शकेल का, याबाबत अनेकांना शंका आहे. कारण आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' आणि वांशिक बंडखोर गटांसारखे लोकशाही पक्ष निवडणुकांवर बहिष्कार टाकू शकतात. ह्याईंग यांनी अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प प्रशासनाने बर्मी लष्करी सहयोगींच्या काही कंपन्यांवरील निर्बंध उठवले. त्यामुळे ह्याईंग यांना प्रोत्साहन मिळाले.

बांगलादेश आणि म्यानमारमधील निवडणुका राजकीय स्थैर्य आणतील आणि भारताला नवीन राज्यकर्त्यांशी मजबूत संबंध निर्माण करण्यास मदत करतील, असा आशावाद अनेक जण बाळगून आहेत. भारतीय राज्यकर्त्यांनाही त्याचीच प्रतीक्षा आहे. आज भारताचा प्रत्येक शेजारी अंतर्गत समस्यांमुळे अस्वस्थ असून इतर देशांशीही सतत संघर्ष अनुभवत आहे. याचा परिणाम भारतावरही होत आहे. कारण पैसा, रोजगार, शांतता, स्थैर्य यापैकी कोणत्या तरी कारणासाठी अनेक प्रांतांमध्ये बंडखोर, अतिरेकी किंवा नक्षलवादी सीमावर्ती भागात हिंसाचार घडवत उपद्रवमूल्य वाढवतात. प्रसंगी भारतातही शिरतात. त्यांच्यापासून आपल्या देशाला धोका आहेच. मात्र अशा प्रकारे निर्माण होत असलेली अस्वस्थता या शेजारी देशांमध्ये लोकशाही नांदल्यास कमी होऊ शकते. त्यामुळे भारताची डोकेदुखी कमी होईल; पण असे होण्याची शक्यता कमी आहे. बांगलादेशमध्ये 'बीएनपी', 'जमात-ए-इस्लामी', 'राष्ट्रवादी आणि इतर इस्लामिक पक्षांचे युनियन बनवून युनूस राष्ट्रपती झाले, तरी त्याचा परिणाम त्या देशात अराजकता येण्यात होणार आहे. 'अवामी लीग'ला निवडणुकीतून बाहेर ठेवले गेले, तर ही निवडणूक निष्पक्ष मानली जाणार नाही. 'अवामी लीग'ने देशात अर्ध्याहून अधिक काळ राज्य केले आहे आणि त्यांची मोठी मतपेढी आहे. निवडणुका निष्पक्ष असतील आणि 'अवामी लीग'ला निर्भयपणे सहभागी होण्याची संधी मिळाली तर शेख हसीनासह त्यांचे बहुतेक नेते बांगलादेशमध्ये परतले असते; परंतु त्यांच्या मनात भीती आहे की बांगलादेशमध्ये परतल्यानंतर त्यांच्या जीविताला धोका होण्याची शक्यता आहे.

या पृष्ठभूमीवर सुरक्षिततेची खात्री होत नाही. तोपर्यंत 'अवामी लीग'चे नेते तेथे परतणार नाहीत. परिणामी, बांगलादेशमध्ये कट्टरतावाद्यांची सत्ता येण्याची दाट शक्यता आहे. कट्टरतावाद्यांच्या हाती सत्ता जाण्याने भारताची डोकेदुखी वाढणार आहे. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

वेध

## आदर्श गावांतील अभिनव ठराव

नितीन शिरसाट

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींनी घेतलेले अनोखे ठराव केवळ कागदापुरते मर्यादित न राहता गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरले आहेत. अशा ठरावांमुळे गावकऱ्यांच्या जीवनमानात, लोकशाही प्रक्रिया, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, आर्थिक विकास स्वनिर्मित उद्योग शेतीपूरक व्यवसाय अशा अनेक बाबतीत प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. मूल्याधिष्ठित गाव म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याच्या साताऱ्याची ओळख आहे. यंदाच्या महाराष्ट्र दिनी या गावच्या ग्रामसभेत शिवीमुक्त गाव करण्याच्या प्रस्तावाला एकमताने मान्यता दिली. कोणीही महिलांचा अपमान करणारी भाषा वापरल्यास, शिवी दिल्यास त्याच्याकडून ५०० रुपये दंड आकारला जाईल. दंड न भरल्यास संबंधित व्यक्तीला ग्रामपंचायतीकडून कोणतेही सरकारी दाखले दिले जाणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला. गावातील वादावादीत आई-बहिणींवरून अपमानास्पद शिव्यांचा वापर वाढत असल्याने दीड हजार लोकसंख्या असलेल्या साताराच्या ग्रामपंचायतीने महिलांच्या सन्मानासाठी अभिनव आणि ठोस पाऊल उचलले. ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन गुळधे यांनी यासाठी पुढाकार घेतला. भांडणे होत असतील, तर ती समजुतीने मिटवावी, पण स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्दप्रयोग यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश त्यांनी ग्रामसभेत दिला. सुरुवातीला काहींनी या निर्णयाला विरोध दर्शविला, मात्र गावातील शिक्षक, आरोग्य सेविका व ज्येष्ठ नागरिकांनी योग्य समज दिल्याने सगळ्यांनी त्यास पाठिंबा दिला. या सकारात्मक निर्णयामुळे गावात नव्या पिढीवर चांगले संस्कार होतील या प्रस्तावाला शिवीमुक्त गाव, दारूबंदी व स्वच्छता मोहीम, तंटामुक्त गाव यासारख्या इतर सामाजिक उपक्रमांची जोडही देण्यात आली.

आदर्श ग्रामपंचायत म्हणून राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. देशपातळीवर पर्यावरण जलसंवर्धन ग्रामपंचायत श्रेणीत पाटोदा ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक पटकावला आहे. माजी सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या काळात पाटोदा गावाची राज्यभर चर्चा सुरू होती. त्या काळात ग्रामविकासाचा पाटोदा पॅटर्न विविध ग्रामपंचायतींसाठी आदर्श ठरला होता. त्यांच्या सहकाऱ्यांनी पाटोदा गावाच्या आदर्शपणाचा इतिहास कायम ठेवला आहे. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीने देशपातळीवर झेंडा रोवला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श ग्रामपंचायत पाटोदा-गंगापूर नेहरीला देशातून दुसऱ्या क्रमांकाचा नुकताच नॅशनल पंचायत अवॉर्ड कार्बन न्युट्रल ग्रामपंचायत पुरस्कार जाहीर झाला. नवी दिल्ली येथे हा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार येथे पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पर्जन्यजल व्यवस्थापनासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या जलसंधारणाचे काम केले. गावात ओढे, तलाव आणि बंधारे बांधून पाण्याची उपलब्धता वाढवण्यात आली. पिण्याच्या पाण्याची सोय, सिंचनाची सोय आणि जमिनीची सुपीकता वाढली आहे. धुळे जिल्ह्यातील रोहिणी ग्रामपंचायत ग्रामीण ई-शासनाचा आदर्श रोहिणी गावात डिजिटल सेवा अगदी गावात पोहोचवणाऱ्या सर्व योजनांची ई-सेवा प्रणाली लागू करण्यात आली जिथून ग्रामपंचायतचे सर्व व्यवहार आजकाल इलेट्रॉनिक पद्धतीने होतात. या उपक्रमामुळे गावातील लोकांना विविध सेवांमध्ये प्रवेश सोपा झाला जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, तक्रारी, सूचना, अवघ्या ग्रामीण सेवांमध्ये सातत्य मिळाले. याच ग्रामपंचायतीने २०२५ मध्ये पुरस्कार जिंकले. गावात ९५० पेक्षा जास्त ऑनलाईन डिजिटल सेवा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील नराले गावाने ठराव घेऊन विधवांना रोजगारासाठी शेतीकामात संधी देण्यासोबतच जास्त योजनेत विधवांना काम मिळाल्याने महिला आत्मनिर्भर झाल्या. त्यांचा आत्मसन्मान वाढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्होकल ते लोकल हा नारा दिल्यानंतर देशभरात याबद्दल चर्चा झाली परंतु प्रत्यक्षात किती जण हे तत्त्व मनापासून आचरणात आणतात? आपल्यापैकी अनेकांना बाहेरचं भारी वाटतं. गावातील उद्योग व्यवसायातून तयार झालेल्या वस्तूंऐवजी ऑनलाईन मागवणे, मुंबई-पुण्याच्या टॅग असलेल्या सेवांवर भरवसा ठेवणे ही आपल्या रोजच्या वस्तू खरेदीतील सवय झाली आहे. परंतु हे करत असताना आपण आपल्याच शेजारी, गावकरी, स्थानिक व्यावसायिक आणि उद्योजकांना दुर्लक्षित करत आहोत, याची जाणीव फार थोड्यांना असते. प्रत्यक्षात आपण हा मंत्र किती प्रमाणात आचरणात आणतो, याचा विचार करण्याची गरज आहे. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून सर्वांची आहे. स्थानिकांसाठी आवाज उठवणे, त्यांच्या कामावर विश्वास ठेवणे ही एक संस्कृती बनायला हवी. ▮

९८८१७१७८२८

दखल

## डॉ. रंगनाथन् आणि आजचे माहिती युग

प्रा. डॉ. मोहन रतकंठीवार

आजच्या माहितीच्या युगात ज्ञानाचे महत्त्व जसे वाढले आहे तसेच ज्ञानाच्या व्यवस्थापनाचे महत्त्वही अफाट वाढले आहे. या संदर्भात भारताने एक महान व्यक्तिमत्त्व दिले, डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् ज्यांनी ग्रंथालयशास्त्राला एक वैज्ञानिक आणि तात्त्विक अधिष्ठान दिले. त्यांचे विचार, कार्य आणि त्यांनी घडवलेला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा आजच्या डिजिटल युगातही तितकाच महत्त्वाचा व प्रभावी आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी तामिळनाडू राज्यातील शियाली येथे झाला. गणित या विषयात पदवी घेतल्यानंतर त्यांनी ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास लंडन येथे केला. ते भारतातील पहिले व्यावसायिक ग्रंथपाल ठरले. त्यांनी ग्रंथालयशास्त्राला एका शास्त्रीय पद्धतीने विकसित केले आणि ग्रंथालय प्रणालीमध्ये अनेक क्रांतिकारी बदल घडवून आणले. डॉ. एस. आर. रंगनाथन् यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पाच मूलभूत नियम आजही संपूर्ण जगभर मान्यताप्राप्त आहेत. ग्रंथ उपयोगासाठी आहेत, प्रत्येक वाचकाला त्यांचा ग्रंथ मिळाला पाहिजे, प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे, वाचकाचा वेळ वाचावा आणि ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. हे पाच नियम केवळ ग्रंथालय व्यवस्थापनापुरते मर्यादित नसून, आधुनिक माहिती व्यवस्थापन आणि डिजिटल डेटाबेसच्या संदर्भातही लागू होतात. यामुळेच ते आजही टाईमलेस ठरतात. डॉ. रंगनाथन् यांनी विकसित केलेली कोलन वर्गीकरण पद्धती ही विशिष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेली प्रणाली होती. 'पीएमईएसटी' (पर्सनालिटी, मॅटर, एनर्जी, स्पेस, टाईम) या पाच परिमाणांवर आधारित ही पद्धत आजही संशोधनग्रंथ, प्रबंध आणि तांत्रिक माहितीचे व्यवस्थापन करण्यात उपयुक्त आहे. या वर्गीकरण प्रणालीमुळे जटिल माहितीचेही सुगम आणि सुसूत्र व्यवस्थापन शक्य झाले, ज्याचा उपयोग आजच्या डिजिटल ग्रंथालय, डेटाबेस व्यवस्थापन पद्धतीमध्ये केला जातो.



डॉ. रंगनाथन् यांच्या काळात ग्रंथालयशास्त्र हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापन, वर्गीकरण आणि वाचनालय चालवणे यापुरते मर्यादित होते. परंतु आजचे ग्रंथालयशास्त्र 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' या रूपात अधिक व्यापक आणि बहुआयामी झालेला आहे. आजच्या अभ्यासक्रमात सूचना आणि माहिती विज्ञान, डिजिटल लायब्ररी व ई-स्रोत, डेटा बेस व्यवस्थापन प्रणाली, वृत्तपत्र, संकेतस्थळे आणि सोशल मीडिया माहिती विश्लेषण, ग्रंथालय ऑटोमेशन व व्यवस्थापन प्रणाली, माहितीचा कायदेशीर, नैतिक व बौद्धिक अधिकार इ. घटकांचा समावेश झालेला आहे.

आज जगभरातील माहितीची वाढ, डिजिटल माध्यमातील प्रचंड वाढती माहिती आणि उपयोगकर्त्यांची वेगाने बदलणारी गरज यामुळे माहिती व्यावसायिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झालेली आहे. ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमातून घडवले जाणारे व्यावसायिक, केवळ पारंपरिक ग्रंथपाल न राहता ते आता माहिती व्यवस्थापक, डिजिटल लायब्ररी संचालक, सामाजिक मीडिया विश्लेषक, डेटा सायंटिस्ट/कंटेंट क्यूरेटर, शैक्षणिक आणि संशोधन माहिती अधिकारी यांसारख्या भूमिका निभावत आहेत.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांची विचारसरणी आणि तत्त्वे आजच्या डिजिटल युगातही सुसंगत आहेत. त्यांनी वापरकर्ताकेंद्रित दृष्टिकोन मांडलेला होता, जो आजच्या 'यूजर एक्सपीरियन्स' संकल्पनेशी अत्यंत सुसंगत आहे. त्यांनी ग्रंथालयाला 'सजीव संस्था' म्हटले आणि आज तीच संकल्पना डिजिटल लायब्ररी, क्लाऊड बेस्ट लायब्ररी, मोबाईल लायब्ररी ॲप्समधून जिवंत झालेली आहे.

आज ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवीधरांसाठी नवी क्षितिजे खुली झालेली आहेत. जसे युनेस्को, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये माहिती अधिकारी, शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये डेटाबेस मॅनेजमेंट तज्ज्ञ, सांस्कृतिक वारसा डिजिटायझेशन प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका उत्कृष्टपणे निभावीत आहेत.

डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् यांचा वारसा हा केवळ भारतासाठी नव्हे, तर संपूर्ण जगासाठी एक मौल्यवान ठेव आहे. त्यांनी दिलेले तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी स्पर्श आजच्या डिजिटल युगातही मार्गदर्शक ठरत आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा केवळ अभ्यासक्रम नाही, तर एक उत्तम समाजनिर्माणासाठी आवश्यक असलेला शाश्वत आधार आहे.


डॉ. रंगनाथन् यांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन आजचा विद्यार्थी माहितीच्या महासागरात शिस्तबद्ध आणि नैतिक मार्गाने चालू शकतो. त्यामुळेच आजच्या युवकांनी या अभ्यासक्रमाकडे केवळ नोकरीच्या संधीसाठी नव्हे, तर ज्ञानसेवा आणि सामाजिक बांधिलकी या दृष्टीनेही पाहावे. कारण 'माहिती हेच आजचे सामर्थ्य आहे आणि माहिती व्यवस्थापक हेच नव्या युगाचे नायक आहेत.' ▮

९३७१४६१२६७

### सिटी बसच्या गतीसाठी नेटाने प्रयत्न होणे गरजेचे

म.न.पालिकेची परिवहन उपक्रम सिटी बस सेवा कोविड काळापासून ठप्प झालेली आहे. सदरहू बस-सेवा सुरळीत सुरु करण्यासाठी अनेक वेळा, अनेकांनी प्रयत्न केले आहेत. आश्वासनांची खैरातही झालेली आहे. येत्या दिवाळीला ३0 आणि त्यानंतर ७0 बसेस मार्गस्थ होणार असल्याची आशादायक बातमी या पूर्वी वाचण्यात आली. शहरवासी दिवाळीची वाट पाहत आहेत.

२५ जुलै २५ च्या सोलापूर तरुण भारत मधील किरणजी बनसोडे यांचा लेख वाचून सोलापूर करांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सध्या सोलापूरच्या चौदा लाख लोकसंख्येसाठी केवळ अठराच बसेस मार्गावर धावतात. त्याही रस्त्यात कुठे, कधी,कशा बंद पडतील, हे सांगता येत नाही. सिटी-बस च्या गतीसाठी आता पालक मंत्र्यांनीच स्टेरिंग हाती घेण्याची गरज, या लेखातून लेखकांनी सिटी बसची व्यथा व सोलापूरकरची



कथा रेखाटली आहे. टेंडर काढण्यात येणार आहे.

चार्जिंग स्टेशनचे काम चालू आहे. सर्वेक्षण पूर्ण होत आले आहे. हे सोलापूरची जनता किती वेळा ऐकून घेणार आहे?सगळ्यांना हे माहीत झाले आहे. आता आमच्या पालक मंत्र्यांनीच ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यांना आमदार, खासदारांनी साथ द्यावी, असे आम्हांला मनापासून वाटते. म.न.पालिकेतला आवाज, किरणजी बनसोडे यांना,या लेखाबद्दल मनापासून धन्यवाद! हा आवाज शहर विकास मंचच्या माध्यमातून लवकरात लवकर, वरिष्ठांप्रत जावाआणि सिटी बस सेवा सुरु करावी ही कळकळीची विनंती.

**- अरुण बा.धुमाळ/सोलापूर.** ९०९०२९२३

वाचक पत्रे

### इंग्लंडमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती

एक प्रसिद्ध म्हण आहे - 'इतिहासाची पुनरावृत्ती होते' अर्थात याचा अर्थ असा नाही किंवा असे सूचित करत नाही की भविष्यात अशाच घटना किंवा नमुने पुन्हा घडतात. याचा अर्थ असा आहे की घटना किंवा घडामोडी अनेकदा अंदाजे परिणाम देतात, ज्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमान समजून घेण्यासाठी प्रासंगिक होतात. ही म्हण ४ ऑगस्ट २०२५ रोजी इंग्लंड आणि भारत यांच्यातील क्रिकेट मालिकेच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीच्या पाचव्या दिवशी ओव्हल लंडन येथे घडलेल्या घटनेला अगदी लागू पडते. याच दिवशी मोहम्मद सिराजने ॲटकिन्सनला दिलेल्या सुंदर यॉर्करसह पाचवी कसोटी भारताने जिंकली आणि भारत-इंग्लंड मालिका २-२ अशी बरोबरीत संपली. खरोखरच एक संघर्षपूर्ण आणि मनोरंजक कसोटी मलिका, कसोटी क्रिकेटला त्याच्या सर्वोत्तम पातळीवर पोहोचवले.

हा विजय माझ्यासारख्या क्रिकेटप्रेमींना आठवण देतो १९७१ मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारताने तिसऱ्या कसोटीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाची आणि इंग्लंडमध्ये पहिल्यांदाच मालिका जिंकल्याची. या विजयात भारताला पहिल्या डावाच्या बळावर ७१ धावांची तूट होती, तर आताच्या पाचव्या कसोटीतही भारताला २३ धावांची तफावत होती आणि दुसऱ्या डावातही भागवत चंद्रशेखर यांच्या जादुई कामगिरीमुळे दिग्गज फिरकीपटूंपैकी एक असलेल्या त्रिकुटातील एकाने ३८ धावांत (१८.१-३- ३८-६) सहा बळी घेतले आणि भारताने तिसऱ्या कसोटीत विजय मिळवला. माझ्या बालपणीच्या आठवणींनुसार, २४ जुलै रोजी गणेश चतुर्थीच्या शुभ दिवशी इंग्लंडच्या भूमीवर भारताचा हा पहिलाच कसोटी विजय होता. हा सामना तीन सामन्यांच्या मालिकेचा भाग होता, जो भारताने १-० ने जिंकला. ४ ऑगस्ट २०२५ रोजी भारताने इंग्लंडला पराभूत केल्यानंतर ओव्हलवर इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

**श्रीकांत वसंतराव हडप**/नागपूर

### अमेरिकेचा वर्चस्ववाद

अमेरिकेची भूमिका नेहमीच वर्चस्ववादाची राहिली आहे. एक तर तुम्ही आमच्याबरोबर आहात, नाहीतर आमचे शत्रू आहात, असा विचार ते करत आलेले आहेत. भारत रशियाकडून तेल विकत घेतो म्हणजे रशियाला युद्धासाठी अर्थसाहाय्य करतो असा जर अर्थ काढला जात असेल तर अमेरिका स्वत: काय करते आहे? पाकिस्तान दहशतवादी कारवाया करत असताना त्याला आयएमएफकडून कर्ज मिळवून देणे, त्याला शस्त्रे विकणे, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला सन्मानाने व्हाईट हाऊसमधे जेवायला बोलावणे, ही सर्व भारताच्या शत्रूला उघडपणे उत्तेजन देणे नाही काय? त्यामुळे अमेरिकेची वर्चस्ववादी भूमिका मोडून काढायची गरज आहे. ▮

**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com, www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# केज तहसीलसमोर केविसंसचे उद्यापासून बसडेपो, रिंगरोड व शेतकरी प्रश्नावर उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ ऑगस्ट**

केज येथे बसडेपो सुरु करा, केज शहारासाठी रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपुल यापैकी हे सोयीचे व फायदयाचे असेल ते), केज शहरातील शेतकऱ्यांना राज्य व केंद्राच्या सर्व कृषी योजनांचे लाभ तात्काळ सुरु करा तसेच संजयगांधी निराधार योजना लाभार्थीची दलालांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी तहसील कार्यालयाने थेट त्यांच्याशीच पत्रव्यवहार करावेत या प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने येत्या शुक्रवार दि १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिली आहे. या बाबतचे निवेदन सर्व संबंधित विभागाला समितीच्या वतीने देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, केज येथे बसआगार सुरु करण्यासाठी केज विकास संघर्ष समिती गेली अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी केज शहरात बीड रोड लगत साडेसात एकर जागा आरक्षित आहे. केज शहर सध्या खामगाव -पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर आहे. केज तालुका अंतर्गत एकशे दहा गांवे आहेत. दररोज हजारो प्रवाशी केज शहरातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात. केज येथून बस गाड्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी केज येथे बसडेपो सुरु करावा तसेच या जागेवर नवीन इलेक्ट्रिक बसगाडयांना लागणारे भव्य चार्जिंग सेंटर उभा करावे अशी मागणी समितीने राज्य परिवहन महामंडळाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

केज शहरातुन वरील दोन्ही प्रमुख महामार्ग भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत एकत्र येऊन पुढे जातात. या अंतरात शहरातील वाहतूक खूप मोठ्या प्रमाणात वाढली



आहे. सर्व प्रकारच्या वाहणाबरोबरच अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील महामार्गांवर अपघाताचे व सततची वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. म्हणून केज शहरासाठी तात्काळ रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपूल यापैकी केज शहरासाठी जे सोयीचे व फायद्याचे असेल त्यास मंजुरी द्यावी अशी मागणी Alcohol संबंधित विभागाकडे केली आहे.

याव्यतिरिक्त केजच्या शेतकऱ्यांना केज येथे नगरपंच्यायत झाल्यापासून केंद्र व राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शासकीय कृषी योजनांचा लाभ नाकारण्यात आला आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. शासनाने शेतकऱ्यांमध्ये भेद करू नये. विशेष म्हणजे राज्यात जेवढ्या नगरपंच्यायत व नगरपरिषदा आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांवर तांत्रिक मुद्दे पुढे करून अन्याय केला जात आहे. तरी केज शहर नगरपंच्यायत अंतर्गत सर्व शेतकऱ्यांना तात्काळ सर्व शासकीय योजनांचे लाभ सुरु करावेत अशी मागणीही समितीने केली आहे.

समितीने केज तहसील अंतर्गत संजय गांधी व श्रावणबाळ निराधारांना मिळणाऱ्या लाभाची दलालांकडून होणाऱ्या लुटीबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. यापूर्वी या सर्व लाभार्थींना आपल्या अर्ज मंजुरी, त्रुटी किंवा अर्ज नाकारण्यात आल्यास सरळ तालुका प्रशासन पत्त्राद्वारे लेखी माहिती देत होते मात्र सध्या ही माहिती प्रशासनाकडून संबंधित लाभार्थींना पत्राद्वारे मिळत नसल्याने कांही दलाल लोक त्यांना चुकीची माहिती देऊन व दिशाभूल करून अवाजवी लूट करत आहेत. यासाठी सर्व लाभार्थींना तालुका प्रशासनाने सर्व माहिती लेखी पत्राद्वारेच कळवावी जेणेकडून त्यांची दलालां कडून लूट होणार नाही अशी मागणीही केज विकास संघर्ष समितीने संबंधित विभागाकडे केली आहे.वरील सर्व मागण्याकरिता केज विकास संघर्ष समितीच्या वतीने येत्या शुक्रवार दि १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण सुरु करण्यात येणार आहे. केजवासियांनी या उपोषणास आपला पाठिंबा द्यावा असे आवाहनही सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. निवेदनावर नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि.मोहनराव कराड, नारायण पंढरीनाथ बिक्कड, संपत वाघमारे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी

## जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत साळेगावातील महिला-पुरुषांनी गिरवले भविष्यातील शाश्वत विकासाचे धडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१२ ऑगस्ट**

जलनायक मयंक गांधी संस्थापित ग्लोबल विकास या संस्थे अंतर्गत चालणाऱ्या सिरसाळा येथे सोमवारी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. माजलगाव तालुक्यातील साळेगाव येथील १३९ महिला आणि पुरुषांनी पाण्याची बचत, जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, शाश्वत उत्पन्न वाढीसाठी आधुनिक शेती, फळबाग लागवड तंत्र आदींचे त्यांनी धडे घेतले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून या गावाला आगामी काळात सुधारणांच्या दृष्टीने आवश्यक अशी कामे आणि मदत करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने गावातील प्रत्येक नागरिक त्या



कामाशी अवगत होऊन एकरूप झाला पाहिजे. सोमवारी झालेल्या कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी यांचीही उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले.

पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी या विचारांना अनुसरून साळेगाव गावातील १३९ महिला व पुरुष शेतकऱ्यांनी कृषिकूल, सिरसाळा येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. जलनायक मयंक गांधी यांच्यासह ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रशिक्षक टीमकडून जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन, जलबचततंत्र, फळबाग लागवड आणि उत्पादनवाढीच्या आधुनिक पद्धती याबाबत त्यांना सखोल मार्गदर्शन मिळाले. तसेच पाणलोट व्यवस्थापन कक्ष, कृषी यांत्रिकीकरण कक्ष, ग्लोबल विकास ट्रस्ट प्रवास कक्ष, कीटक संगोपन गृह आणि माती प्रयोगशाळा यांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतील नव्या तंत्रज्ञानाची ओळख झाली. हा कार्यक्रम शेतकऱ्यांच्या शाश्वत शेती प्रवासातील एक प्रेरणादायी पाऊल ठरला.

# प्रतिभा नगर येथे धार्मिक विधींसह भूमिपूजन; भव्य मंदिराची निर्मिती होणार

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१२ ऑगस्ट**

किल्लेधारूर येथील प्रतिभा नगर परिसरात भव्य श्री महादेव मंदिराच्या भूमिपूजन सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. धारूरच्या आनंदाचा, भक्तीचा आणि पवित्रतेचा क्षण अनुभवण्यासाठी परिसरातील मोठ्या संख्येने भाविक आणि मान्यवर उपस्थित होते. हा भूमिपूजन कार्यक्रम दि. ११ ऑगस्ट २०२५, सोमवार रोजी सकाळी १०.०० वाजता अत्यंत भक्तिभावाने आणि धार्मिक विधींनी संपन्न झाला.

या सोहळ्यासाठी अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यामध्ये उद्योजक



श्री. संतोष बाप्पा शिरसाट, उद्योजक श्री. विभीषण गायकवाड, नगरसेवक श्री. रुपेश रामचंद्र चित्रवार, व्यापारी श्री. सुरेश पिलाजी आणि व्यापारी श्री. मोहन मदन खंडेलवाल यांचा समावेश होता. या पुण्यकार्यात परिसरातील सर्व भक्त, भाविक आणि ग्रामस्थांनी आपली उपस्थिती नोंदवून श्री महादेवाच्या आशीर्वादाचा लाभ घेतला. प्रतिभा नगर येथील ज्येष्ठ नागरिक तथा सभासद, प्रतिभा कॉलेजमधील सर्व सभासद आणि प्रतिभा कॉलनीतील परिसरातील मोठ्या संख्येने महिला या सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या. यासोबतच धारूर शहरातील भजनी मंडळींनी आपल्या मधुर भजनांनी कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले.

हा भूमिपूजनाचा कार्यक्रम याच माध्यमातून पार पडला. मंदिराच्या निर्माणाविषयी माहिती देताना आयोजकांनी सांगितले की, हे मंदिर साधारणतः १९०० चौरस फुटांच्या क्षेत्रफळात उभे राहणार आहे. मंदिराच्या परिसरात एक सुंदर बाग-बगीचा देखील तयार करण्यात येणार आहे, ज्यामुळे हे स्थळ धार्मिक आणि शांततेचे केंद्र बनेल.या भव्य मंदिरामुळे धारूरच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा वर्धापन दिन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ ऑगस्ट**

९ ऑगष्ट हा महाअंनिस चा वर्धापन दिन असतो . त्यानिमित पूर्वसंध्येला धर्मनिरपेक्षतेची बिकट वाटचाल या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई महाअंनिस चे अध्यक्ष, पत्रकार व लेखक, शेतकरी चळवळीचे नेते मा. अमर हबीब होते. प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी कॉंग्रेस चे डॉक्टर सेल चे राज्याध्यक्ष डॉ नरेंद्र काळे होते तर प्रमुख मार्गदर्शक महाअंनिस च्या राज्यप्रधान सचिव मा. रुक्साना मुल्ला होत्या . विशेष उपस्थिती म्हणून बीड जिल्हा महाअंनिस चे उपाध्यक्ष प्रा सुभाष धुळे, अंबाजोगाई महाअंनिस चे उपाध्यक्ष एस. बी. सय्यद सर व कॉ बब्रूवान पोटभरे सर होते.याप्रसंगी अंबाजोगाई शहरातील पुरोगामी विचाराचे पाईक हजर होते . सुधाकर तट,राजेसाहेब किर्दत, प्राचार्य दामोधर थोरात, संतराम कराड, अनंतराव जगतकर, नागनाथ तोंडारे, मुजिब काजी, महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा चे शिक्षक , बनेश्वर शिक्षण संस्थेचे शिक्षक, मराठवाडा शिक्षक संघटनेचे शिक्षक हजर होते . तसेच महा अंनिस च्या अंबाजोगाई शाखेच्या महिला रेखा देशमुख, तेलंग मॅडम, ज्योती चव्हाण उपस्थित होत्या .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाअंनिस चे जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण यांनी केले. सुत्रसंचलन अंबाजोगाई महाअंनिसचे कार्याध्यक्ष सूर्यकांत तेलंग यांनी केले . तर आभार पंडीत चव्हाण यांनी मानले . हा कार्यक्रम सक्सेस अकॅडमी, पवन हॉटेल शेजारी, बसस्टॅन्ड च्या मागे आयोजित करण्यात आला होता .हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सक्सेस अकॅडमी व अंबाजोगाई महाअंनिस ने विशेष प्रयत्न केले .

# रक्षाबंधन आणि क्रांती दिन नानाजी देशमुख विद्या मंदिरात नाविन्यपूर्ण साजरा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

दीनदयाल शोध संस्थान संचलित,नानाजी देशमुख विद्या मंदिर बीड येथे क्रांती दिन आणि रक्षाबंधन हे सण साजरे करण्यात आले. त्यात मंचावर प्रमुख उपस्थित दीनदयाल शोध संस्थान चे संचालक मा. गंगाधरजी देशमुख सर, व गोकुळ शिशू वाटिका प्रमुख सौ .आरती ताई जोशी उपस्थित होते. क्रांती दिना निमित्त विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांच्या वेशभूषा केल्या होत्या. अथर्व आहेर याने चंद्रशेखर आझाद, जीवा माळी मंगल पांडे, अंश पडवळकर भगतसिंग, पार्थ गायके बाबू गेनू, श्री बिक्कड सावरकर, अविष्कार राठोड सुखदेव, संयोगिता धांडे झाशीची राणी , विहान वाघ राजगुरू अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी वेशभूषा बरोबरच भाषण देखील केले. क्रांतीताई पोरवाल यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली . राखी पौर्णिमेचा देखील कार्यक्रम खूप सुंदर रित्या सादर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आणि शाळेनी आणलेल्या राख्या विद्यार्थ्यांना बांधण्यात आल्या मुलींनी मुलांना राख्या बांधल्या व शाळेतर्फे खाऊ म्हणून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आनंद उत्सव साजरा केला. तसेच सरांनी चिमुकल्यांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सचिव डॉ.सीमाताई जोशी,ड. अर्चनाताई तुंगार, श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व शिक्षक वृंद यांनी सहकार्य केले. कार्यक्रम खूप सुंदर रित्या सादर झाला.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात हर घर तिरंगा अंतर्गत राखी बनवणे कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.१२ ऑगस्ट**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात घर घर तिरंगा या मोहिमेअंतर्गत राखी तयार करणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत प्रशासकीय अधिकारी नगर परिषद अंबडचे मा. श्री रामेश्वर घोळवे, स्वच्छता निरीक्षक मा श्री अशोक लोंढे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी मा. श्री संजीव मैंद, समुदाय संघटक अधिकारी मा. श्री. शरद मगर, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री.प्रदीप जोशी, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख श्रीम. प्रतिभा आजबे उपस्थित होते.

या कार्यशाळेत विद्यालयातील ६४ विद्यार्थी तिरंगा राखी बनवणे कार्यशाळेत सहभागी होते.या कार्यशाळे प्रसंगी श्री शरद मगर यांनी घर घर तिरंगा या मोहिमेचे वर्णन करत विद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रशासकीय अधिकारी नगर परिषद अंबडचे कर्मचारी तसेच माजी सैनिक मा. रामेश्वर घोळवे यांनी आपल्या मनोगतामध्ये भारत देशाची सेवा करत असताना आलेले अनुभव तसेच देशप्रेम व रक्षाबंधन यातील नाते विद्यार्थ्यांसमोर सांगितले. याप्रसंगी सूत्रसंचालन श्री अनिल चव्हाण तर आभार प्रदर्शन श्रीमती प्रतिभा आजबेताई यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याणमंत्र्यांनी करण्यात आली.



शुक्रवारी दिनांक ८,८,२०२५ रोजी ,श्री क्षेत्र रामतीर्थ मठात ,शिव पुराण कथेची सांगता झाला ,ह,भ,प,योगेश महाराज गेवराई कर ,यांच्या वाणीतून सात दिवस शिव महापुराण परीसरातील सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते, श्री विध्यागुरू महाराज व गुरू माई यांच्या हास्ते ग्रंथ पुजा व व्यास पुजा करून ,महा आरती करण्यात आली , व ,महाप्रसादा साठी भाविक भक्त मोठा संख्येने उपस्थित होते ,या परिसरातील सर्व महिला नी अन्नधानाची व्यवस्था केली होती ,आदी सर्व भाविक भक्त उपस्थित होते,

# माजलगाव बसस्थानकाची पाडापाडी रोखण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्षांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ ऑगस्ट**

मराठवाड्यात उत्कृष्ट असलेले माजलगाव बस स्थानक पाडण्याचा कुटील डाव गुत्तेदारांना हाताशी धरून आखण्यात आला आहे. दरम्यान माजलगाव बस स्थानकाची पाडापाडी रोखण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्षांना निवेदन देण्यात आले.

माजलगाव येथे राज्य परिवहन महामंडळाचे टोलेजंग बस स्थानक आहे. १९९० च्या दशकात सदरील बस स्थानकाची उभारणी झाली आजही हे बस स्थानक सुस्थितीमध्ये उभे असल्याचे दिसते. आहे त्या बस स्थानकाची डागडूजी करून ही इमारत अजून ४० वर्ष तरी भक्कम अवस्थेत उभी राहू शकत असताना चांगल्या स्थितीतील बस स्थानक पाडून पत्राचे शेड उभारण्याचा कुटील डाव आखण्यात आला



आहे.गुत्तेदराचे पोट भरण्यासाठी काही लोकप्रतिनिधी टक्केवारीच्या आशेने बस स्थानक जमीनदोस्त करीत आहेत. या बस स्थानकाशी माजलगाव वासियांचा भावनिक ऋणानुबंध आहे बस स्थानकाची इमारत जुनी झाली असल्यास ती पाडण्यास हरकत नाही परंतु चांगल्या स्थितीमधील बस स्थानक पाडून त्या ठिकाणी पत्र्याचे व फायबरचे शेड उभारण्याचे कारण काय?दरम्यान या बसस्थानक इमारतीला नवीन बस स्थानक हा पर्याय ठरू शकत नाही नवीन बस स्थानक हे पत्र्याचे व फायबरचे असणार आहे तसेच कमी जागेत बस स्थानक उभारण्यात येणार आहे. हे बस स्थानक चाळीस वर्षे

ही टिकणार नाही असे असतानाही जुने भक्कम सुस्थितीतील बस स्थानक का पाडण्यात येत आहे? हे कोडे उलगडणे अनाकलनीय आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनतेच्या भावना लक्षात घेऊन पाडण्यात येणाऱ्या बसस्थानक प्रक्रियेला स्टे द्यावा अशी जनतेची आशा आहे. माजलगाव भाजप अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्याकडे दिलेल्या निवेदनात माजलगाव बस स्थानकाचे नूतनीकरण करण्यात यावे. नवीन बस स्थानक हे पत्राचे व फायबरचे असल्याने त्याला माजलगाव वासियांचा विरोध आहे अशा आशयाचे निवेदन दिले आहे या निवेदनावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांनी सरकारकडे योग्य बाजू मांडणार असल्याची प्रतिक्रिया दिली दरम्यान याप्रसंगी भाजप अध्यक्षांसोबत सरचिटणीस पवन मोगरेकर सोशल मीडिया राज्य सदस्य दत्ता महाजन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सोमेश दहिवाळ यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी

## वराह चोरीच्या वादातून रस्त्यावरच राडा; दगडफेक, तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर अंबाजोगाईतील घटना; दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ ऑगस्ट**

मोरेवाडी शिवारात वराह चोरीच्या कुरापतीवरून सुरू झालेल्या वादातून झालेल्या तलवार आणि दगडफेकीत दोन्ही बाजूंनी गंभीर जखमी होण्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण आठ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घटनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश लक्ष्मण जाधव (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता ते व त्यांचे भाऊ भारत जाधव स्विफ्ट डिझायर गाडीतून भावाच्या जोगाईवाडी शिवारातील घरी जात होते.मोरेवाडीतील लाल सटवा मेंडके यांच्या घरासमोरून जात असताना गाडीच्या मागील काचेला जोरात आवाज आला. गाडी थांबविल्यावर लाला भागवत मेंडके, सुजीत उर्फ सुरज सटवा मेंडके, सटवा भागवत मेंडके आणि पवन मेंडके (सर्व रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) यांनी घेराव घातला.

भीतीपोटी तेथून निघून धउच् कॉलेजसमोर गाडी

थांबवल्यानंतर आरोपी पुन्हा दोन दुचाक्यांवर आले. त्यांनी 'जनावरे चोरतोस का?' असा सवाल करत तलवारीने भारत जाधव यांच्या डोक्यात वार केला. बचाव करताना दिनेश जाधव यांच्या तळहातावर गंभीर जखम झाली. त्यानंतर दगडफेक करून भावंडांसह युवराज मेंडके, हेमंत जिरंगे यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून लाला मेंडके, सुजीत मेंडके, सटवा मेंडके आणि पवन मेंडके यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला.

दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता भारत जाधव व त्यांचे सहकारी स्विफ्ट डिझायर गाडी थेट त्यांच्या घरासमोर आणून उभी केली. गाडी हटविण्याविषयी विचारणा केली असता 'तुझे डुकरे आम्ही चोरून विकले, काही करु शकत नाहीस' असे म्हणत शिवीगाळ केल्याचा दावा फिर्यादीने केला.

त्यानंतर तो, त्याचा भाऊ सटवा व पुतण्या सुरज पोलिस स्टेशनकडे तक्रार करण्यासाठी निघाले असता, धउच् कॉलेजजवळ भारत लक्ष्मण जाधव, दिनेश लक्ष्मण जाधव, युवराज बाबुराव गायकवाड व हेमंत धिरंगे (सर्व रा. सदर बाजार, अंबाजोगाई) हे तलवार व लोखंडी रॉड घेऊन आले. त्यांनी सटवा मेंडके यांच्या हातावर, दिनेश यांनी छातीवर, तर युवराज यांनी गळ्यावर तलवारीने वार करून जखमी केले. सुरज मेंडके यांच्यावरही तलवारीने हल्ला


झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या तक्रारीच्या आधारे चारही आरोपींवर प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेत दोन्ही बाजूंतील अनेक जण जखमी झाले असून, तलवार आणि दगडफेकीत गाडीचेही नुकसान झाले आहे. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

# जिल्हा बांधकाम कामगार कार्यालयात मृत बांधकाम कामगारांच्या नावावर खोटे दाखले तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार !!

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

जालना जिल्हा बांधकाम कामगार कार्यालयात मृत बांधकाम कामगारांच्या नावावर खोटे दाखले तयार करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. यामध्ये कार्यालयातील अधिकारी, दलाल व कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) चालक यांच्या संगनमताचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.




तक्रारदार अर्जुन सुभाषराव कणसे यांनी जिल्हाधिकारी जालना तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अधिकारी अमोल जाधव यांनी दलालांशी संगनमत करून मृत बांधकाम कामगारांच्या नावावर वारसांना मिळणाऱ्या ५० हजार व २० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे खोटे प्रस्ताव तयार केले. मृत्यू प्रमाणपत्रे आणि आधार कार्डाची प्रत सीएससी सेंटरमार्फत अपलोड करून हे प्रस्ताव मंजूर करून घेतल्याचे आरोप आहेत.

यातून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा दावा करण्यात आला असून, प्रत्यक्षात लाभार्थी कुटुंबांना पैसे मिळाले नाहीत. एवढेच नव्हे, तर मुलांच्या शिष्यवृत्ती योजनेतही कटकारस्थान करून निधी लाटल्याचा आरोप आहे.

तक्रारदारांनी म्हटले आहे की, काही प्रकरणांमध्ये मृत्यू झाल्यापासून ९० दिवसांचा कालावधी उलटूनही नियमबाह्यरीत्या मंजुरी देण्यात आली. ग्रामसेवक व मंडळ अधिकाऱ्यांच्या संमतीने तयार करण्यात आलेले हे प्रस्ताव कार्यालयातील अधिकाऱ्यांनी माहिती असूनही मंजूर केल्याचा दावा करण्यात आला आहे.१४ ऑगस्टपर्यंत कारवाईचा अल्टिमेटम या प्रकरणातील सर्व संबंधित अधिकारी, दलाल व सीएससी सेंटर चालकांविरोधात १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत फौजदारी गुन्हे दाखल करून चौकशी न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा अर्जुन कणसे यांनी दिला आहे.

हा प्रकार जिल्हा बांधकाम कामगार कार्यालयातील कामकाजावरील विश्वासघातक आहे, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. आता प्रशासन व शासनाची पुढील कारवाई काय होते, याकडे जिल्ह्यातील कामगार व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# परतुर पोलिसांनी दुचाकी चोराला केले जेरबंद

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

परतुर पोलिसांनी एका दुचाकी चोरट्याला जेरबंद केले असून, त्याच्या ताब्यातुन ७ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या ११ महागड्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, परतुरसह परिसरातील दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी पोलीस निरिक्षक सुदाम भागवत यांनी विशेष पथकाची नेमणुक केली आहे. हे पथक चोरट्यांचा शोध घेत असतांना त्यांस माहिती मिळाली की, सुरेश भगवान आबुज (रा. आबुजवाडी, ता. माजलगाव, जि. बीड) हा चोरीच्या दुचाकी वापरत आहे. त्यानुसार पथकाने सुरेश आबुजचा शोध घेवून त्याला ताब्यात घेत पो लीस खाक्या दाखविला असता त्याने परतुर पोलीस ठाण्यात दाखल एका गुन्ह्याची कबुली दिली. इतकेच नाही तर जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातुन चोरलेल्या ७लाख ७० हजार रुपये किंमतीच्या महागड्या दुचाकी पोलिसांच्या स्वाधीन केल्या.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली परतुर ठाण्याचे पोलीस निरिक्षक सुदाम भागवत, फौजदार अमोल रावते, अंमलदार धर्मा शिंदे, अशोक गाढवे, किरण मोरे, गजानन राठोड, विजय जाधव, भागवत खाडे, अमोल गायकवाड, राम हाडे, नरेंद्र चव्हाण, दशरथ गोपनवाड, सॅम्युअल गायकवाड, पवनकुमार धापसे यांच्या पथकाने केली.



# वाटुरात तीज महोत्सव उत्सवात साजरा !

## तीज महोत्सवाच्या ९व्या दिवशी ढंबोळीच्या कार्यक्रमात बंजारा बांधवाची लाक्षणीय उपस्थिती !

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील वाटुर फाटा येथिल बंजारा बांधवांनी सर्वानूमते दि.२ ऑगस्ट पासुन ते ११ तारखे पर्यंत मोठ्या उत्साहात तीज महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात १२१ टोपल्यात काळी माती टाकुन कुमारिका गव्हाची पेरणी करतात व त्या गव्हाच्या सारख्या ९ दिवस टोपलीत सकाळ– संध्याकाळ पाणी टाकतात त्या टोपलीस तीज असे म्हणतात.

या १० दिवसांत रोज संध्याकाळी महीला व पुरूष बंजारा समाजाच्या पारंपारिक बोली भाषेतून हलगीच्या तालावर गीत गायन करतात तसेच डीजेच्या तालावर नृत्य सादर करून मोठा आनंदोत्सव साजरा करतात व ९व्या दिवशी आपल्या सोयऱ्या धावऱ्यांना तसेच जवळपासचे नातेवाईकांना बोलावून सर्वानुमते भोग भंडारा करतात व मोठी रॅली काढण्यात येते व सर्व कुमारीका आपल्या तीजाच्या टोपल्या फुला हाराने सजविण्यात येते सर्वांच्या डोक्यावर घेऊन त्यांची मीरवणुक काढण्यात येते व घरी केलेल्या ढंबोळी चे त्या ठिकाणी वाटप केल्या जाते. व जी टोपली जास्त सजवीन्यात आलेली किंवा जीचे तीज चांगले हिरवेगार दीसत असेल त्या कुमारीकेला प्रतिष्ठीत नागरिक किंवा तीज महोत्सवाच्या आयोजक मंडळी कडून बक्षीस ही दिल्या जाते.



हे तीज महोत्सव बंजारा समाजात पारंपारिक सन असुन या तीज महोत्सवाची अख्यायिका खुप मोठी आहे. त्या नंतर शेवटच्या दिवशी त्या पेरलेल्या तीजाची खुडणी करून नदीत विसर्जन करतात. या शुद्ध श्रावण महिन्यातील दहा दिवसात धार्मीक कार्याची रेलचेल असुन मोठा आनंद साजरा करण्यात येतो हे विशेष आहे.

# संक्षिप्त

## स्वस्त धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास कारवाई
## कुंभेफळ येथील स्वस्त धान्य दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

रास्त भाव दुकानामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याबाबत जालना जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानदारांनी दक्षता घ्यावी, तसेच नियमित धान्य वाटप करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. स्वस्त धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ अन्वये कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

रास्त भाव दुकानामध्ये नियमित अन्नधान्य वाटप न करणे, धान्याची पावती न देणे, दुकान वेळेत सुरु न ठेवणे, नोंदवह्या नसणे, दर्शनिय भावफलक नसणे आदि गंभीर त्रुटी तपासणीदरम्यान आढळुन आल्या आहेत. महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ मधील नियम ३ (क) अंतर्गत जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी जालना तालुक्यातील कुंभेफळ येथील रास्त भाव दुकानदार गणेश श्रीमंत गवारे यांचे दुकान क्र.१०५ चे प्राधिकारपत्राची १०० टक्के अनामत रक्कम जप्त करुन प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले. यावेळी सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश जाधव, निरीक्षण अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी रास्तभाव दुकानाची तपासणी केली व प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

## धनगर पिंपरीच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जिजाबाई नरोडे यांची निवड!



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड; धनगर पिंपरी, जालना – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धनगर पिंपरी येथे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी एक महत्त्वाचं पाऊल उचलण्यात आलं आहे. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जिजाबाई शिवाजी नरोडे यांची, तर उपाध्यक्षपदी किरण कैलास काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. २०२५ ते २०२७ या दोन वर्षांसाठी ही नवीन समिती स्थापन करण्यात आली आहे. या निवडीसाठी शाळेत पालकांची एक खास बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सर्वांनी मिळून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काम करण्याची शपथ घेतली.

यावेळी शिक्षणतज्ज्ञ ज्ञानेश्वर साळुंके यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर हे या समितीचे पदसिद्ध सचिव म्हणून काम पाहतील. तसेच, मंगेश तांबे, ममताबाई ठोंगे, अनुसया मिसाळ, दिलीप बर्डे यांसारख्या सदस्यांचाही यात समावेश आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष जिजाबाई नरोडे, उपाध्यक्ष किरण काळे आणि इतर सदस्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला पालक आणि शिक्षणप्रेमींचा मोठा सहभाग होता. सूत्रसंचालन आवारे सर आणि मोरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आवारे सरांनी केले. या नवीन समितीमुळे शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक उत्साहवर्धक होईल अशी आशा आहे. ही निवड शाळेच्या प्रगतीसाठी एक सकारात्मक आणि महत्त्वपूर्ण घटना मानली जात आहे.

## वडीगोद्री येथे दगडू मामा गावडे यांच्या तेरावे निमित्त कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न



तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील वारकरी संप्रदायातील दगडू मामा गावडे यांच्या तेराव्या निमित्त ह. भ. प. शिवाजी महाराज भागवत यांच्या कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले होते यावेळी ह. भ. प. शिवाजी महाराज भागवत यांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधिनीचे काम केले व आज या देशात खरी गरज जर असेल तर ती म्हणजे प्रत्येक मुलाबाळांनी आपल्या आई– वडिलांना अनाथ आश्रम मध्ये ठेवू नये यावेळी वारकरी संप्रदायाची महिलावर्ग व पुरुष मंडळी उपस्थित होते

# बम बम भोले'च्या निनादात कावडयात्रा उत्साहात संपन!
## 'मेरे भोले से भोले बाबा' भक्तिगीतावर थिरकली तरुणाई

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/ प्रतिनिधी

पवित्र श्रावण महिन्यामध्ये सोमवारी महादेवाची बेलपत्र अर्पण करून भक्तिभावने पूजा करतात. अशाच भक्तिभावनेने ११ ऑगस्ट रोजी श्रावणाचा तिसरा सोमवार निमित्त दि.१० आगस्ट रोजी श्रीक्षेत्र मर्दडी (देवी) ता. जि बुलढाणा येथून शिवभक्तांनी कावड यात्रेसाठी पाणी आणत मर्दडी (देवी ता. जि बुलढाणा) ते शिवेश्वर महादेव मंदिर बोरगाव मठ कावडयात्रा काढण्यात आली. महिला, भगिनींनी रस्त्यावर पाणी शिंपडून, रांगोळ्या काढून, विविध ठिकाणी कावड यात्रेचे स्वागत केले.'बम बम भोले'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाले होते. कावड यात्रा निमित्त शिवभक्तांसाठी जागोजागी चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.



जय जय श्रीराम, हर हर महादेव, जयश्री महाकाल अशा घोषणांनी कार्यक्रमाची ऊर्जा वाढवली. मेरे भोले से भोले बाबा, आये सवारी मेरे महाकाल कि, महाकाल सरकार मेरे महाकाल सरकार, बगड़ बम बम बम लहरी ही भक्तिगीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणावर तरुणाई थिरकली.

ही कावड यात्रा सोमवारी बोरगाव येथे दाखल होत, बोरी फाटा मार्ग बोरी ते शिवेश्वर महादेव मंदिर बोरगाव मठ येथे मर्दडी (देवी) वरुन आणलेल्या जल ने शिवशंकराला जलाभिषेक करण्यात आला. शिवेश्वर महादेव संस्थान कडुन या कावड यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले होते.त्यानंतर चहापाणी व बोरगाव मठ येथील गावकऱ्यांनी महाप्रसादाची व्यवस्था केली होती. यावेळी बोरगाव बु, बोरी, बोरगाव मठ, बोरगाव वाडी व परिसरातील शिवभक्तांची कावड यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# निधन वार्ता छबाबाई डोंगरे यांचे वृद्धापकाळाने निधन

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी



आ. अर्जुनराव खोतकर यांच्या मावशी व ज्ञानेश्वर वामनराव डोंगरे यांच्या मातोश्री श्रीमती छबाबाई वामनराव डोंगरे, रा. बाजीउमरद यांची वयाच्या ९५ व्या वर्षी वर्धापकाळाने आज दि १२/०८/२०२५ सकाळी ७.०० देवआज्ञा झाली. त्यांच्यावर अंत्यसंस्कार आज दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० मिनिटांनी बाजीउमरद मुळगावी करण्यात आले आहे. त्यांचा स्वभाव अंत्यत मनमिळाऊ स्वभावाचा होता. त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली सुना नातवंडे पुतणे असा मोठा परिवार आहे.

# विश्वशांती महोत्सव यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांतून विश्वशांती आणि व्यसनमुक्तीचा संदेश दिला जातो - सद्गुरु चंद्रकांत दादा मोरे

## परतुर श्री . स्वामी समर्थ सेवा केंद्रास वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत आ. बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून ५० लक्ष रुपयाचे सभामंडप

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र परतूर येथे आमदार बबनराव लोणीकर यांच्या अथक प्रयत्नातून पन्नास लाख रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या भव्य सभामंडपाचे भूमिपूजन दिंडोरीचे युवा संत सद्गुरू चंद्रकांत मोरेदादा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. रक्षाबंधनाच्या पावन मुहूर्तावर आयोजित या कार्यक्रमाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाला. सकाळपासूनच हजारो महिला भगिनी हातात राख्या घेऊन केंद्रात दाखल झाल्या होत्या. या भगिनींनी सद्गुरू मोरेदादा आणि आमदार लोणीकर यांना राख्या बांधून आपला आनंद आणि श्रद्धा व्यक्त केली. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या हजारो भक्तांच्या उत्साहाने वातावरण भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयोजक अनिरुद्ध कातारे पाटील यांनी दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे वैशिष्ट्यपूर्ण परिचय करून दिला. ते म्हणाले, हा सेवा मार्ग मानवी जीवनातील प्रत्येक समस्येचे समाधान करणारे एक प्रभावी व्यासपीठ आहे. इथे प्रत्येक व्यक्तीच्या जन्मपत्रिकेनुसार त्याला योग्य क्षेत्रात यश कसे मिळवता येईल, यावर सातत्याने मार्गदर्शन केले जाते. मनाची शांती ही बाजारातील वस्तू नाही की ती विकत घेता येईल; ती केवळ आध्यात्मिक सेवा, उपासना आणि समर्पणातूनच प्राप्त होते. विज्ञान आणि अध्यात्म यांची अनोखी सांगड घालून चालणारा हा सेवा मार्ग संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वरदान आहे. मी सर्वांना आवाहन करतो की, आपल्या जवळच्या दिंडोरी प्रणित केंद्राशी नियमित संपर्क ठेवावा आणि या मार्गाच्या माध्यमातून जीवनाला नवे दिशा द्यावी. कातारे पाटील यांच्या या शब्दांनी उपस्थितांना सेवा मार्गाच्या गहनतेची जाणीव झाली. सद्गुरू चंद्रकांत मोरेदादा यांनी आपल्या ओजस्वी भाषणात मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आरोग्य हे जीवनाचे मूलभूत आधारस्तंभ आहे. आजच्या धावपळीच्या युगात योग्य आहार आणि संतुलित जीवनशैली राखणे अत्यंत आवश्यक आहे. चुकीच्या सवयींमुळे अनेक आजार उद्भवतात, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आहारात पौष्टिक घटकांचा समावेश करावा आणि व्यायामाला प्राधान्य द्यावे. सोशल मीडियाच्या व्यसनाबाबत बोलताना ते म्हणाले, आजची युवा पिढी सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकली आहे. हे व्यसन वेळेचा अपव्यय करून मानसिक ताण वाढवते. त्यापासून दूर राहून वेळेचा सदुपयोग अभ्यास, सेवा आणि आत्मविकासासाठी करावा. फॅशनच्या नावाखाली होणारी अतिरेकी जीवनशैली ही देखील एक समस्या आहे; ती केवळ बाह्य सौंदर्यावर भर देते, पण आंतरिक शांतीला हानी पोहोचवते. महिलांच्या अलंकारांमागील विज्ञान स्पष्ट करताना मोरेदादा म्हणाले, महिलांच्या अलंकारांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर त्यामागे गहन विज्ञान आणि अध्यात्म लपलेले आहे. उदाहरणार्थ, कुंकू, मंगळसूत्र किंवा बांगड्या हे केवळ परंपरा नाहीत, तर ते स्त्रीच्या आरोग्य, ऊर्जा आणि आध्यात्मिक संरक्षणाशी जोडलेले आहेत. हे समजून घेतल्यास जीवन अधिक अर्थपूर्ण होईल. कृषी शास्त्रावर बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक आणि पर्यावरणस्नेही पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले. कृषी हे आपल्या देशाचे मेरुदंड आहे. रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे आहे, ज्यामुळे उत्पादन वाढेल, मातीचे स्वास्थ्य राखले जाईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल. शेतकरी बंधूंनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून स्वावलंबी व्हावे. मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटलच्या कार्याबाबत सविस्तर माहिती देताना ते म्हणाले, हे हॉस्पिटल गरीब आणि गरजू रुग्णांसाठी एक आशेचा किरण आहे. येथे आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबत अध्यात्मिक मार्गदर्शनही दिले जाते. केवळ शारीरिक उपचार नाही, तर मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर रुग्णांना बरे केले जाते. आतापर्यंत हजारो रुग्णांनी येथे मोफत सेवा घेतली असून, हे सर्व कार्य श्री स्वामी समर्थांच्या कृपेने आणि सेवा मार्गाच्या प्रेरणेतून सुरू आहे. अशा कार्यातून समाजातील असमानता दूर होईल आणि सर्वांना निरोगी जीवन मिळेल. मोरेदादांच्या या शब्दांनी उपस्थित भक्तांच्या मनात नवचैतन्य निर्माण झाले. महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि परतुर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणात श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाशी असलेल्या आपल्या गहन नात्याबाबत भावपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, मी या सेवा मार्गाचा एक नम्र सेवेकरी आहे. माझे संपूर्ण कुटुंब गेल्या पन्नास वर्षांपासून या मार्गात समर्पित भावनेने सेवा करत आहे. सामूहिक विवाह सोहळे आयोजित करणे, स्वच्छता अभियान राबवणे, पाणीपुरवठा योजना सुरू करणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे आणि व्यसनमुक्ती कार्यक्रम चालवणे ही सर्व कामे मी दिंडोरी प्रणित सेवा मार्गाच्या प्रेरणेने आणि तेथे घेतलेल्या विशेष प्रशिक्षणातून केली आहेत. मी नियमितपणे दिंडोरीला भेट देतो, तेथील गुरुजनांकडून ज्ञान ग्रहण करतो आणि ते ज्ञान माझ्या राजकीय कारकीर्दीत समाजसेवेसाठी उपयोगी आणतो. हे ज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर व्यावहारिक जीवनातही मार्गदर्शक ठरते. पावसाच्या चमत्काराबाबत बोलताना लोणीकर म्हणाले, गेल्या तीन दिवसांपासून सलग पाऊस पडत होता. हवामान तज्ज्ञांनीही आज पावसाची शक्यता वर्तवली होती. मात्र, आयोजक अनिरुद्ध कातारे पाटील यांनी मला विश्वासाने सांगितले की, भाऊ, पाऊस येणार नाही. श्री स्वामी समर्थ महाराज पाऊस थांबवतील. आणि खरंच, स्वामींच्या कृपेने पाऊस थांबला आणि कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला. हे स्वामींच्या असीम कृपेचे आणि सेवेकऱ्यांच्या अटूट विश्वासाचे फळ आहे. या प्रसंगी विविध गावातून प्रतिनिधी सेवेकरी मोठ्या संख्येने माता–भगिनी उपस्थित होत्या. दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे कार्य केवळ आध्यात्मिक नाही, तर राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे आहे, असे आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले. विश्वशांती महोत्सव यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमांतून विश्वशांती आणि व्यसनमुक्तीचा संदेश दिला जातो, असे सद्गुरू चंद्रकांत मोरेदादा यांनी सांगितले. सद्गुरू चंद्रकांत मोरेदादांचे प्रेरणादायी भाषण आरोग्य, कृषीशास्त्र, अध्यात्म आणि समाजसेवेचा अनमोल संदेश देत होते. आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रेरणादायी भाषण श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या पन्नास वर्षांच्या समर्पणाचा गौरव आणि समाजसेवेचा संकल्प व्यक्त करत होते. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र परतूर येथे सद्गुरू चंद्रकांत मोरेदादा यांच्या शुभ हस्ते सभामंडपाचे भूमिपूजन आणि रक्षाबंधनाचा भक्तिमय सोहळा संपन्न झाला. हा कार्यक्रम दिंडोरी प्रणित सेवा मार्गाच्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याला नवी दिशा देत असून, भविष्यात अशा उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्यास मदत होईल.



### हर घर तिरंगा अभियानात स्वच्छता अभियान

# म. गांधी पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची स्वच्छता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ ऑगस्ट -**

'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते स्वच्छता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. महात्मा गांधी पुतळ्यापासून या स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली असून, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह महापालिका अधिकाऱ्यांनीही या मोहिमेत सहभाग मोठया प्रमाणात सहभाग नोंदवला.



जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियानांतर्गत २ ऑगस्टपासून १५ ऑगस्टपर्यंत वेगवेगळे अभियान उपक्रम राबविले जात आहेत. शहरातील महात्मा फुले पुतळ्यापासून आज या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी या मोहिमेत सहभागी होताना स्वतः महात्मा गांधी पुतळा तसेच जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदवला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महापालिका उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांनीही या मोहिमेत सहभागी होत 'हर घर तिरंगा' अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व तहसील, उपविभागीय कार्यालय येथेही आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील महत्त्वाचे ठिकाणे ज्यामध्ये पुतळा परिसर, शासकीय कार्यालय, ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता केली जाणार आहे.

यावेळी शहरात स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते महात्मा गांधी पुतळ्याजवळ प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली.

या मोहिमेत निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, नायब तहसीलदार मकरंद दिवाकर, महसूल विभागाचे विभाग प्रमुख, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त यांच्यासह विविध विभागांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात हर घर तिरंगा या मोहिमेअंतर्गत स्वच्छता मोहिमेचा समावेश करण्यात आला आहे. या स्वच्छता मोहिमेला जिल्हाभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील भोकर, किनवट, हिमायतनगर या तालुका बसस्थानकात प्रशासनाने स्वच्छता मोहीम राबवली. त्याचवेळी मुखेड तहसील कार्यालयानेही स्वच्छता मोहीम राबवत जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता व्हावी हा मूळ उद्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये प्रामुख्याने समाविष्ट केला आहे.

# आनंद दत्तधाम आश्रमाच्या महाप्रसादरुपी अन्नदानातून लाखों भाविक क्षुधातृप्त

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. १२ ऑगस्ट -**

मागील अनेक वर्षांपासून सातत्याने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात अग्रेसर असलेल्या आनंद दत्त धाम आश्रम येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण मासा निमित्त परिक्रमा यात्रेदरम्यान भाविकांना महाप्रसादरुपाने अन्नदान करण्यात आले. लाखों भाविक प्रवासी या महाप्रसादाचा लाभ घेत समाधानाची अनुभुती घेत क्षुधातृप्त झाले.

या मठाचे वैशिष्ट्य ओळखून काही महिन्यापूर्वीच मंत्री मेघना दीदी बोर्डीकर-साकोरे यांनी सुद्धा आश्रमास भेट देऊन येथील महाप्रसादाचा आनंद घेतला हे विशेष उल्लेखनीय आहे.

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असे सुप्रसिध्द तिर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र माहूरगडास वर्षभरात याठिकाणी साजरे करण्यात येणाऱ्या डझनावर धार्मिक यात्रोत्सवामुळे यात्राभूमी असेही संबोधले जाते.श्री रेणुकादेवी मंदिर संस्थान,श्री दत्तात्रेय मंदिर शिखर संस्थान, अनुसया मंदिर,श्री देवदेवेश्वर मंदिर संस्थान या प्रमुख देवस्थानासह शहरातील व गडावरील अनेक मठ, आश्रमात धार्मिक सणानिमित्त यात्रोत्सव साजरे करण्यात येतात.यात मागील अनेक वर्षांपासून आनंद दत्त धाम आश्रमाच्यावतीने भाविक प्रवाशांच्या सेवेसाठी नियमित गरजू अन्नछत्र चालवले जाते.आश्रमाकडून अन्नदान व अनेक समाजोपयोगी उपक्रम मठाधिपती राष्ट्रसंत द.भ.प.साईनाथ महाराज वसमतकर जे महाराष्ट्र राज्याचे स्वच्छतादूत आहेत ते आपल्या अनुयायांसह चालवताना दिसून येतात.



महाराज हे भाविकांना प्रवचन व कीर्तनातून प्रबोधन करत सामाजिक बांधिलकीतून स्विकारलेली सप्तसुत्री स्वीकारण्याचे आवाहन करतात. यामध्ये आश्रमाचे प्रवक्ते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाऊराव पाटील हडसणीकर यांसह उद्योजक जवाहरलाल जयस्वाल, शिक्षक शेषराव पाटील तसेच पुंडलिक हुम्बे सावकार , नथ्थु पाटील, संतोष मते, वैभव खराटे, सुधीर जाधव यांचेही मोलाचे सहकार्य या अन्नदान कार्यक्रमासह प्रत्येक आयोजनास निरंतर प्राप्त होत असते,हे सुद्धा तेवढेच विशेष.

## संक्षिप्त वृत्त

### दिव्यांग बांधवांच्या वतीने तहसीलदार देऊळगावकर यांचा सत्कार

**मुदखेड**-मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगीरी केल्याबद्दल नांदेड जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट तहसीलदार म्हणून पुरस्कार मिळाल्या बद्दल मुदखेड प्रहार क्रांती संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच तालुक्यातील रोही पिंपळगांव ग्रामपंचायत कार्यालय येथील ग्राम पंचायात अधिकारी डि. के. क्षीरसागर यांना सर्व दिव्यांग बांधव व प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिव्यांग बांधवांचे ५ टक्के अनुदान वाटप करण्यात यावे म्हणून निवेदन देण्यात आले होते क्षीरसागर यांनी दि. १५ ऑगस्ट रोजी पाच टक्के निधी वाटप करतो असे आश्वासन दिले. यावेळी प्रहार ता.अध्यक्ष माधव पांचाळ सरेगावकर, प्रहार मा.ता.प्रमुख अनिल शेटे पा, महिला तालुकाप्रमुख केसरबाई पाटील शिंदे,प्रहार महिला प्रतिनिधी शंकर शिंदे, दिलीप पा.शिंदे,ग्यानोबा पा.लोकरे, आनंदराव पा.कल्याणे, दत्ता पा.नाद्रे, ओंकार चव्हाण, रमेशराव राऊत, एकनाथ तारु,यासह आदिंची उपस्थिती होती.



### हदगाव नगर परिषदेच्यावतीने स्वच्छता अभियान

**हदगाव**-हर घर तिरंगा हर घर स्वच्छता या उपक्रमा अंतर्गत नगर परिषदेच्या वतीने भाई बन्सीलाल तोष्णीवाल हुतात्मा स्मारक या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले असून भारतीय स्वातंत्र्य दिनाला ७९ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्त शहरात सलग तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदरील कार्यक्रम नगर परिषद प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी लेखापाल संकेत लांडगे, लेखा परीक्षक रवींद्र डेंगळे, स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता गोविंद सिरसाट, विद्युत अभियंता प्रशांत डोईजड, कर निर्धारक व प्रशासकीय सेवा प्रवीण मंगनाळे, पी. एम. ए. वाय. अभियंता प्रसाद कदम, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सखाराम बोरकर , शहर समन्वयक प्रणाली मुजमुले, कर निर्धारक व प्रशासकीय सेवा गोविंद नागरगोजे, लिपिक अजीम शेख, लिपिक अर्चना वानखेडे , वाहन चालक मुजीब शेख यांच्यासह विवेकानंद विद्यालय येथील विद्यार्थी उपस्थित होते.

### अखिल भारतीय समता परिषदेच्या जिल्हा अध्यक्षपदी नारायण अंबुरे

**नवीन नांदेड** -अखिल भारतीय समता परिषदे चे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या आदेशानुसार नुकत्याच करण्यात आलेल्या कार्यकारीणी मध्ये नांदेड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते छगन भुजबळ यांचे समर्थक नारायण अंबुरे यांची अखिल भारतीय समता परिषदेच्या जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली या नियुक्ती बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अखिल भारतीय समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष नामदार छगन भुजबळ यांच्या आदेशानुसार राज्य अध्यक्ष समीर भुजबळ यांनी एका नियुक्ती पत्राद्वारे नांदेड जिल्हा अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते नारायण अंबुरे यांची अखिल भारतीय समता परिषदेच्या जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबद्दल नारायण अंबुरे यांचे मित्रमंडळ बाळू राऊत, देवराव पांचाळ, नवनाथ विभुते, नरेंद्र कंचटवार, सखाराम शितळे, संतोष जाधव, रमेश तालीमकर, शिवाजी मगर यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



### बाफना ते जुना मोंढा शहिद भगतसिंघ रोड च्या काम जलद गतीने पूर्ण करा: नंबरदार

**नांदेड**-बाफना ते जुना मोंढा भगतसिंग रोड रस्त्याचे दुतर्फा काम सुरू आहे. गुरुद्वारा बोर्डाकडून पारंपारिक दसरा व गुरुतागदी कार्यक्रमानिमित्ताने नगरकीर्तनाचे आयोजन होत असतो. नगरकीर्तन याच मार्गावरून होत असल्याने सदर काम जलद गतीने पूर्ण करून येणाऱ्या भाविकांचा मार्ग सुकर करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जगदीपसिंघ नंबरदार यांनी जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे. दरवर्षी दसरा ते गुरुतागद्दी कार्यक्रमाचे पारंपारिकरित्या आयोजन करण्यात येते. त्यानिमित्त बाफना ते भगतसिंग रोड दरम्यान दसरा दि. २ ऑक्टोबर.व२२ दिवाळी दिवाळी, २७ ऑक्टोबर गुरुतागद्दी प्रकाशपर्व निमित्त नगरकीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. नगरकीर्तनामध्ये देश-विदेशातून हजारो शिख भाविक सहभागी होत असतात. विशेष म्हणजे यामध्ये निशानसाहेब पकडणारे निशानचीसिंघ व अनेक श्रद्धाळू अनवानी पायाने सहभागी होतात. या नगरकीर्तन मार्गाचे ड्रेनेज लाईन व रस्ता निर्माण कार्य सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे झाले असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सदर काम अत्यंत संथ गतीने होत असल्याने जलद गतीने पूर्ण करून दसऱ्यापूर्वी मार्ग मोकळा करावा अशी मागणी माहिती अधिकार व सामाजिक कार्यकर्ते जगदीपसिंघ नंबरदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांच्याकडे केली आहे.

# क्षितिज जाधव व मित्र मंडळींनी वाचविले जखमीचे प्राण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ ऑगस्ट -**

अपघात झाल्यानंतर जखमींना मदत करण्याऐवजी अनेकजण मोबाईलमधून फोटोशेसन करतात, परंतु नांदेड-लातूर महामार्गावर दुचाकीच्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका युवकाला नांदेड येथील भाजपाचे चिटणीस व त्यांच्या मित्रांनी मदत करुन माणुसकीचे दर्शन घडविले.

नांदेड येथील भाजपाचे चिटणीस क्षितिज जाधव व त्यांचे मित्र हे ७ ऑगस्ट रोजी रात्री १२:३० च्या सुमारास लातूर येथून नांदेडकडे येत असतांना त्यां शिरूर ताजबंद जवळ एक अपघातग्रस्त मोटरसायकल दिसून आली तर रस्त्याच्या दुसऱ्याबाजूला एक जण गंभीर जखमी अवस्थेत असल्याचे आढळून आले. क्षितिज जाधव व त्यांच्या

मित्रांनी क्षणाचाही विलंब न करता त्या जखमीला स्वतःच्या गाडीतून शिरूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले व जखमीच्या नातेवाईकांशी संपर्क करून नातेवाईक ग्रामीण रुग्णालयात येईपर्यंत ते रुग्णालयात थांबून होते, त्यानंतर ते नांदेडकडे रवाना झाले.

लातूर ते नांदेडरस्त्यावर दिवसा-रात्री नेहमी वाहनांची गर्दी असते परंतु जखमी दिसूनही एकानेही त्याला मदत केली नाही. त्यातच एखाद्याने मदत केली असती तर मदती अगोदर मदतीचे फोटो शूट करून ते फोटो सोशल मीडियावर टाकून स्वतः ची वाहवा मिळवली असती, परंतु क्षितिज जाधव व त्यांचे मित्र गोविंदउठीलवाड, मनोज चिंचोलीकर, आकाश लेवडे यांनी फोटो, व्हिडीओ न करता थेट जखमीला मदत करत त्यांचे प्राण वाचवित माणुसकीचे दर्शन घडवले.

# आ. केराम यांचा नवी मुंबई दौरा ; अनुसूचित जाती कल्याण समितीने घेतला योजनांचा सखोल आढावा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १२ ऑगस्ट -**



महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीच्या नवी मुंबई दौऱ्यात किनवटचे आमदार तथा समिती सदस्य आ. भीमराव केराम यांनी आज अत्यंत चिकित्सकपणे विविध विषयांचा आढावा घेतला. दोन दिवसीय दौऱ्याच्या पहिल्या दिवशी समितीचे माननीय अध्यक्ष व सदस्य सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह, नवी मुंबई येथे एकत्र जमले.

सकाळी १०.१५ ते ११ वाजेपर्यंत महानगरपालिका सभागृहात स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींशी अनौपचारिक चर्चा घेण्यात आली. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत महानगरपालिका, नवी मुंबई येथील सेवेत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेष, तसेच शासन व महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथील अनुसूचित जाती प्रवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भरती, बढती, आरक्षण आणि कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर चर्चा झाली. यावेळी उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांनी समितीतील सर्व सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत करून स्मृतिचिन्ह भेट दिले.

आ. भीमराव केराम यांनी या चर्चेत सक्रिय सहभाग घेत प्रत्येक बाबीची काटेकोर छाननी केली. भरती प्रक्रियेतील विलंब, अनुशेषाची टक्केवारी, आरक्षणाच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि विविध कल्याणकारी योजनांचे प्रत्यक्ष लाभ याबाबत त्यांनी अधिकारी वर्गाकडून अचूक माहिती मागवली. त्यांनी आकडेवारीसह प्रत्यक्ष उदाहरणे विचारून योजनांची कार्यक्षमता तपासली आणि आवश्यक सुधारणा करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

सायंकाळी समितीने पोलीस आयुक्त कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन कार्यपद्धतीचा आढावा घेतला. त्यानंतर मागासवर्गीय वसतीगृह, महानगरपालिका शाळा व स्थानिक विकासकामांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी व नागरिकांशी संवाद साधला. या भेटीतही आ. केराम यांनी सोयी-सुविधांची गुणवत्ता, देखभाल आणि विद्यार्थ्यांच्या अडचणींबाबत सविस्तर विचारपूस केली.

समितीचा दौरा दुसऱ्या टप्प्यात सुरू राहणार असून, आ. भीमराव केराम यांची सक्रिय व चिकित्सक भूमिका स्थानिक पातळीवर चर्चेचा विषय ठरली आहे.

# इस्लापूरच्या लाडक्या बहिणींनी पाठवल्या मुख्यमंत्र्यांना राख्या



**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १२ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री लाडके देवाभाऊ यांना इस्लापूर शहरातील असंख्य महिलांनी रक्षाबंधनाचे औचित्य साधून तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांच्या मार्फत आज दि ११ ऑगस्ट रोजी इस्लापूर शहरातील हनुमान मंदिर परिसर येथे मोठ्या संख्येने जमून महाराष्ट्राचे प्रगतिशील मुख्यमंत्री तथा असंख्य महिलांचा सन्मान करणारे लाडक्या बहिणीचे लाडके भाऊ देवाभाऊ यांना दीर्घायुष्य लाभों व त्यांच्या हातून या महाराष्ट्रा सह देशाचा विकास घडो म्हणून मोठ्या प्रमाणात एक राखी व एक पत्र लिहून पाठविले आहे.

नुकतेच रक्षाबंधनाच्या दिवशी महाराष्ट्र सरकार है महिलांच्या विश्वासाचे सरकार आहे असे सांगत मोठ्या विश्वासाच्या बळावर आपण राज्यातील सर्व माता-भगिनींपर्यंत आणि शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचवू आणि त्यांना न्याय मिळवून देऊ, अशी ग्वाही नुकतीच महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत दिली त्यामुळे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, संघटन मंत्री संजयजी कोडगे, आमदार भीमराव केराम, जिल्हाध्यक्ष किशोरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधन हा सन मोठ्या उत्साहात पार पाडला, त्याप्रसंगी किनवट दक्षिणचे भारतीय जनता पार्टीचे मंडळ अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांच्यामार्फत शहरातील हनुमान मंदिर परिसर येथील बूथ क्रमांक २८६ मधील असंख्य महिलांनी मुख्यमंत्री देवाभाऊ यांना राख्या पाठवल्या यावेळी बोलताना भाजप हा केवळ पक्ष नसून आहे. आज भाजपची प्रत्येक महिला ही मुख्यमंत्र्यांची बहीण होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. पण किनवट दक्षिण युवा मोर्चातर्फे

तालुक्यातील महिलांचा सन्मान व पक्षाची विचारसरणी आणि सरकारची कामे, योजना प्रत्येक घराघरांपर्यंत पोहोचल्या पाहिजे आणि महिलांना स्वातंत्र्यानंतरही दुय्यम स्थान दिले गेले होते पण केंद्रात मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक योजना सुरू करून त्यांना सक्षन करण्यावर अधिक भर दिला जात आहे असे तालुकाध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांनी सांगून आपला भाऊ देवा भाऊ एक राखी सन्मानाची एक राखी लाडक्या भावाची म्हणून या सर्व महिलांनी दिलेल्या राख्याचा स्वीकार करून एका बॉक्समध्ये ते संकलित करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी संकल्प केला यावेळी भाजपाचे पदाधिकारी यांच्या सह असंख्य लाडक्या बहिणी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### रोजगार मेळाव्याचे बुधवारी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ ऑगस्ट -**

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगारची संधी उपलब्ध व्हावी यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन बुधवार १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून कंधार तालुक्यातील कंधार कॉलेज ऑफ फार्मसी बाळांतवाडी येथे करण्यात आले आहे. या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे

# भोकरच्या 'शाहू'कडून 'तिरंगा रॅलीचे' आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १२ ऑगस्ट -**

येथील श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे सातत्याने आपल्या आगळ्यावेगळ्या नवोपक्रमांसाठी प्रसिद्ध आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून 'शाहू परिवाराकडून' भोकरकरांना राष्ट्रभक्तीची एक अनोखी मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. यासाठी शाहू परिवार सज्ज असून शाहूचे सुमारे तीन हजार विद्यार्थी या तिरंगा रॅलीत सहभागी होणार आहेत. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्टला सकाळी १०:३० वाजता ही तिरंगा रॅली शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून निघून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी वंदन करून मूख्य रस्त्याने पुन्हा परत जाईल. लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव शिरिष भाऊ देशमुख गोरठेकर यांच्या हस्ते तिरंगा रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात होईल. विशेष आकर्षण म्हणजे या रॅलीसाठी सुमारे एक हजार मिटर लांबीचा राष्ट्रध्वज तयार केला जात आहे. देशातील आजपर्यंतच्या इतिहासातील हा सर्वाधिक दुसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा राष्ट्रध्वज असणार आहे. यापूर्वी सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीचा राष्ट्रध्वज एका रॅलीत वापरला गेला. 'शाहू परिवाराकडून' तयार केला जाणारा 'तिरंगा' एक हजार मिटर लांबीचा असेल. केवळ 'शाहू परिवारा'मुळेच देशप्रेमाने ओथंबलेला हा क्षण आणि सोहळा अनुभवण्याची सुवर्णसंधी भोकरकरांना लाभणार आहे असे सर्वत्र बोलले जात आहे.

### प्रस्तावित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, १२ ऑगस्ट -**

तालुक्यातील सिरपल्ली येथे प्रस्तावित सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प उभारणीच्या विरोधात मोठा जण आक्रोश पाहायला मिळाला. ४१ गावच्या शेतकऱ्यांनी एकत्र जमून या प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शविला आहे.

तालुक्यातील शिरपली येथे सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाच्या विरोधात नुकतीच भव्य अशी जाहीर सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी बाबुराव वानखेडे हे होते. व तसेच निम्न पैनगंगा धरण विरोधी समितीचे अध्यक्ष प्रल्हाद जगताप पाटील, संघटक सचिव मुबारक तवर, सचिव विजय पाटील, वि.ना. कदम, यांच्यासह पेनगंगा नदी काठावरील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या ऐतिहासिक सभेत प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शविण्यात आलो.

# सोयाबीनवर येलो मोझॅकचा प्रादुर्भाव; शेतकरी संकटात!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १२ ऑगस्ट -**

तालुक्यात यंदाच्या खरिप हंगामात सुरुवातीला समाधानकारक पावसामुळे शेतकरी वर्गा मध्ये नविन आशावाद निर्माण झाला होता.

जून महिन्यातील मान्सून पासुन पाऊस हा वेळेवर आणि संतुलित झाल्याने सोयाबीन सह इतर पिकां ची जोमदार वाढ झाली. पिकांची सतेज वाढ पाहून शेतकरी समाधानी होते. मात्र, नागपंचमीच्या सुमारास पडलेल्या रोगराई युक्त पावसामुळे सोयाबी न पिकावर येलो मोझॅक रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील होटाळा, नरसी, कांडाळा, धानोरा, मूगांव, मरवाळी, बेंद्री खंडगावसह अनेक गावांमध्ये या रोगाचे प्रमाण चिंताजनक असून, शेतकऱ्यांमध्ये आता चिंता आणि नैराश्याचे वातावरण आहे. येलो मोझॅकमुळे पानांवर पिवळसर डाग,रंग बदल, तसेच झाडांची वाढ खुंटणे यांसारखी लक्षणे दिसून येत आहेत.रोग नियंत्रणात न आल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

या रोगामुळे सोयाबीनच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होणार असल्याने नायगांव तालुक्यातील अनेक शेतकरी मानसिक तणावात असून, काहींनी रोगग्रस्त पिकांची झाडे उपटून काढून टाकण्यास सुरुवात केली आहे. तर काही शेतकरी कीटक नाशकांची फवारणी करून रोग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, यामुळे शेतीचा खर्च वाढत असून उत्पन्नाच्या तुलनेत तोट्याची शक्यता अधिक असल्याने चिंता अधिकच वाढली आहे.

**तालुक्यातील कृषी विभागाचा सल्ला** कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना रोगप्रतिरोधक वाण वापरण्याचा सल्ला दिला आहे. याशिवाय येलो मोझॅकचा प्रमुख वाहक असलेल्या पांढऱ्या माशीवर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य कीटकनाशकांची फवारणी करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. नायगांव तालुक्यातील होटाळा, नरसी, कांडाळा, धानोरा, मूगांव, मरवाळी, बेंद्री खंडगावसह अनेक गावातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन या पिकांवरील येलो मोझॅक रोगाचा वाढत्या प्रादुर्भावाची पार्श्व भूमी लक्षात घेऊन. या वेळी अनेक शेतकऱ्यांनी सरकारकडे तातडीच्या मदतीची मागणी करीत. पिक विमा या सारख्या योजनेअंतर्गत नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी करत आहेत.

**Change is name**

I am changing my name SYED RAHIM SYED MIR to SAYYED RAHIM SAYYED MIR for passport issuance

**टि.सी.हरवली**

मधूमती गंगाधर डूबूकवाड या नावाची ईयत्ता पहिली उत्तीर्ण ची टि.सी.नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कूणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा

**संपर्क पत्ता**
**गंगाधर डूबूकवाड**
**रा.भोकर ता,भोकर जी.नांदेड,**
**मो.नं.९७६५२५८४५५**

**टि.सी.हरवली**

दत्ता गोमा पवार या नावाची ईयत्ता दहावी उत्तीर्ण ची टि.सी.मार्कमेमो,रहिवाशी,जातीचे प्रमाणपत्र असलेली बॅग नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असुन कूणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा

**पत्ता**
**दत्ता गोमा पवार**
**रा.जांभळी पो.पांडूर्णा ता.भोकर जी.नांदेड**
**मो.नं.८९८६६१६९४१**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्त करा- रविकांत तुपकर

## क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या आसूड मोर्चाला मोठा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

हिंगोली जिल्ह्यात मागील आठ महिन्यात ४२ शेतकऱ्यांनी कर्ज बाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्या आ- हेत. राज्य शासनाने शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले आहे परंतु अद्याप कर्जमाफी न झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. तत्काळ शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी आसूड मोर्चाला संबोधित करतांना दिला आहे.

येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात आसूड मोर्चाला सुरूवात झाली. हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी, नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी बोलतांना तुपकर म्हणाले की, हिंगोली जिल्ह्यात मागील आठ महिन्यात ४२ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी आणि नापीकीला कंटाळून जीवन संपवले आहे. अजून किती शेतकऱ्यांचा जीव राज्य सरकार घेणार आहे असा सवाल यावेळी रविकांत तुपकर यांनी केला. शेतकऱ्यांना पीकवीमा मिळत नाही, सुरळीत वीजपुरवठा मिळत नाही, शेतीमालाला भाव मिळत नाही, बँका वेळेवर पीककर्ज देत नाहीत, चकरा मारून शेतकरी कृषी विभाग, महावितरण, बँकांचे उंबरठे झीजवत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शासन आणि प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. राज्य शासनाने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते परंतु अद्याप कर्जमाफी झाली नाही. तत्काळ शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्त करा अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी तुपकर यांनी दिला.

यावेळी राज्य शासनाला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यामार्फत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी गजानन कावरखे, नामदेव पतंगे, दशरथ मुंडे, संजय मुंडे, शांतीराम सावके आदींची उपस्थिती होती.

# मंगल कार्यालयात बालविवाह झाल्यास परवाने रद्द होणार- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

जिल्ह्यातील कोणत्याही मंगल कार्यालयात बालविवाह झाल्यास त्याचा परवाना रद्द करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी रा- हुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले आहेत.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ नुसार आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा कृति दल, प्रतिपालकत्व आणि प्रायोजकत्व, बाल विवाह निमूर्लन जिल्हा कृती दल व बाल कल्याण समिती त्रैमासिक काम काज आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, ज्या गावात बालविवाह होईल त्या गावास/ग्राम पंचायतीस जिल्हा वार्षिक निधीतून निधी देण्यात येणार नाही. तसेच १० दिवसापेक्षा जास्त दिवस शाळेत गैरहजर राहणाऱ्या बालिकांची माहिती शिक्षण विभागाने महिला व बाल विकास विभाग हिंगोली यांच्याकडे देण्यात यावी. तसेच जिल्ह्या- तील प्रत्येक गावात १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्राम सभेमध्ये गावात बालविवाह होणार नाही याबाबत ठराव मंजूर करुन घेण्यात यावा व त्याची एक प्रत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास देण्यात यावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीमध्ये कक्षाने राबविलेले विविध जनजागृती कार्यक्रम, मिशन वात्सल्य पोर्टल, एनसीपीसीआर पोर्टल, घर पोर्टल, पीएम केअर पोर्टल, गती शक्ती पोर्टल व केअरींग पोर्टल या सर्व पोर्टलवरती भरण्यात येणाऱ्या माहितीबाबत, प्रतिपालकत्व आणि प्रायोजकत्व या योजनेबाबत, बालविवाह निर्मूलनासाठी निवडण्यात आलेल्या ५० गावांमध्ये ग्राम बाल संरक्षण समितीच्या म ाध्यमातून घेण्यात येणारे विविध कार्यक्रम तसेच जिल्ह्यातील बालविवाह समूळ नष्ट करण्यासाठी आखलेल्या योजना तसेच जिल्हा कृती दल बैठक, चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) कामकाजाची माहिती सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एस.आर. दरपलवार यांनी बैठकीत दिली.

या बैठकीस मोहन भोसले, व्ही.एस.भोजे, शिक्षण विभाग, विवेक वाकडे, प्रकाश साबळे, एच.बी.पोपळघट, जिल्हा सरकारी कामगार अधिकारी एस.जी.फड, डॉ.बालाजी भाकरे, डॉ. पी.एन.फोपसे, ए.आर.बोथीकर, बाल न्याय मंडळ सदस्य सत्यशीला तांगडे, अशोक खुपसे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी बाळासाहेब झिंजाडे, गटविकास अधिकारी अमितकुमार मुंडे आदींची उपस्थिती होती.

# प्रेस फोटोग्राफरची औंढा, कळमनुरी तालुका कार्यकारणी घोषित



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर संघटनेने नुकतीच औंढा नागनाथ आणि कळमनुरी तालुक्यासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे.

औंढा नागनाथ तालुका अध्यक्षपदी रामा सोळंके यांची निवड करण्यात आली आहे. कळमनुरी तालुका अध्यक्षपदी संजय शितोळे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक, जिल्हाध्यक्ष गोपाल बोरकर, गजानन थोरात, संतोष अर्धापूरकर, विजय गुंडेकर, संस्थेचे सल्लागार प्रधान गिरीकर, सुनील प्रधान, निलेश गरवारे, आर्या आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात संघटनेची उद्दिष्ट्ये, भविष्यातील योजना आणि छायाचित्रकारांसमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला. छायाचित्रकारांनी एकत्र येऊन काम केल्यास अनेक समस्यांवर मात करता येईल, असे त्यांनी सांगितले. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या कामाची सुरुवात लवकरच करणार असल्याचे सांगितले. हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर संघटनेचा उद्देश छायाचित्रकारांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या समस्या सोडवणे हा आहे. या नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून हे कार्य अधिक प्रभावीपणे केले जाईल अशी अपेक्षा आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या निवडीमुळे हिंग- ोली जिल्ह्यातील पत्रकारिता अधिक मजबूत होईल आणि छायाचित्रकारांना एक व्यासपीठ मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप बोरकर तर आभार प्रदर्शन सुनील प्रधान यांनी मानले.



**हिंगोली- पोळा सण काही दिवसांवर आला असून यानिमित्त हिंगोलीच्या बाजारपेठेत रंगीबेरंगी वेसन, गोंडे, घुंगरू, बैलांच्या आकर्षक झुली आदी साहीत्य विक्रीसाठी आले असून शेतकरी साहीत्य खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज फोटोग्राफी कार्यशाळेचे आयोजन

हिंगोली- जिल्हा प्रेस फोटोग्राफर व फोटोग्राफर असोसिएशन यांच्या वतीने १४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध फोटोग्राफर बैजू पाटील यांच्या उपस्थितीत हिंगोली येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात सकाळी दहा वाजता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील फोटोग्राफर बंधूंना या क्षेत्रा- तील नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याची माहिती व्हावी याकरिता जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त १४ ऑगस्ट रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत वाइल्ड लाईफ व मॉडेलिंगसाठी प्रसिद्ध असणारे फोटोग्राफर बैजू पाटील यांचे म ार्गदर्शन लाभणार आहे. सदरील कार्यशाळेचे उद्घाटन माजी आम दार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. संतोष बांगर तर स्वागताध्यक्ष म्हणून युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. याव्यतिरिक्त सदरील कार्यक्रमास जगजीतराज खुराणा, दिलीप चव्हाण, बाबाराव बांगर, प्रकाश थोरात, राजेश जयस्वाल, अशोक अग्रवाल, युवा सेना जिल्ह- ाप्रमुख राम कदम, मयूर कयाल यांची देखील प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदरील कार्यक्रमाचा जास्तीत जास्त फोटोग्राफर बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन फोटोग्राफर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक, जिल्हाध्यक्ष गजानन थोरात, सचिव संदीप बोरकर, कार्याध्यक्ष संतोष अर्धापूरकर, कोषध्यक्ष विजय गुंडेकर यांनी केले आहे.

### कै विठ्ठलराव घुगे शाळेत युनीसेफतर्फे मार्गदर्शन

हिंगोली- कै.विठ्ठलराव घुगे माध्यमिक स्कूल गंगानगर, हिंग- ोली येथे युनिसेफ व दयासागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था. तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली. यांच्या युनिसेफ द्वारा डिजिटल प्रोडिक्टिव्हिटी फॉर ए.आय. प्रोजेक्ट अंतर्गत ७ वी ते १० वी च्या विद्यार्थी यांना युनिसेफ़ तर्फे फ्री कोर्स विषयी मार्गदर्शन करून, त्याचा भाविष्यात कशाप्रकारे उपयोग होण- ार आहे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. फ्रॉड लोकांपासून वाचण्यासाठी मोबाईल सेफ्टी बद्दल माहिती सांगण्यात आली. हा कोर्स मोफत असल्यामुळे गोरगरीब मुलांना, युवक युवतींना या कोर्सचा फायदा होईल आणि त्यांच्या शिक्षणात भर पडेल असे संस्थेचे अध्यक्ष किशोर घोरपडे यांनी सांगितले. यावेळी संस्थाच्या सचिव वैशाली सूर्यवंशी, ट्रेनर- रुख्मिणी जोगेवार, देवानंद गायकवाड, गजानन जोगेवार, शुभम चितेवार, सपना राठोड, गजानन हाके, सय्यद कलीम यांनी विद्यार्थी यांचे फ्री रेजिस्ट्रेशन करून दिले. यावेळी मुख्याध्यापिका. सौ.चेंडके एम. पी., मुख्याध्यापक अर्धापूरकर व शाळेतील शिक्षकांनी सहकार्य केले.

### ७२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७२ वाहन चालकांवर पोलिसांनी सोमवारी विविध पोलिस ठाण्यांतर्गत कारवाई करीत त्यांच्याकडून ६८ हजारांचा दंड वसुल केला आहे तसेच जुगार कायद्यांतर्गत एका ठिकाणी पोलिसांनी छापा मारून आरोपीतांकडून मुद्देमाल जप्त केला असून आरोपीतांविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नर्मदेश्वर महादेव मंदिरात महाआरती व महाप्रसादाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १२ ऑगस्ट**

श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी हिंगोली शहरातील रिसाला बाजार परिसरातील प्राचीन श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरात भाविकांची प्रचंड गर्दी दिसून आली. या निमित्ताने मंदिरात सकाळी विशेष अभिषेक, महाआरती आणि त्यानंतर महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच मंदिरामध्ये 'हर हर महादेव'च्या गजराने वातावरण भक्तीमय झाले होते.

पहाटेपासूनच भाविकांनी शिवलिंगावर जलाभिषेक करण्यासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. फुलांनी आणि बेलाच्या पानांनी सजवलेले शिवलिंग सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या विशेष सोहळ्यासाठी मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सायंकाळी महाआरतीनंतर महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिरात भजन-कीर्तनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते. शेकडो भाविकांनी या महाप्रसादाचा आस्वाद घेतला. यावेळी रमेशचंद्र बगडीया, कैलास बगडीया यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानातील चंदनाचे झाड चोरी करणारे जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

शहरातील शिवाजी नगर भागात असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानातील संरक्षण भिंतीच्या आतील चंदनाचे झाड तोडून चोरी करणाऱ्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २४ तासात अटक केली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या निव- ासस्थानातील संरक्षण भिंतीच्या आतील चंदनाचे झाड तोडून चोरी केल्याची घटना दि ११ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता उघडकीस आली. या प्रकरणी शिवप्रसाद शिंदे यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरूध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्याकडे सोपविला. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील उपनि माधव जिव्ह- ारे, उपनि विक्रम विठुबोने यांनी तपासाची चक्रे फिरवली असता सदरील आरोपी चंदनाचे झाड तोडून झाडाचे खोड विक्रीसाठी कुरूंदा येथून रिसोडकडे स्प्लेंडर दुचाकीवर जाणार असल्याची माहीती मिळाली. पथकाने आर- ोपी जावेद इस्माईल कुरेशी, शेख अन्वर शेख जानीरा रा कुरूंदा यांना नर्सी फाटा येथे ताब्यात घेवून त्यांच्याकडून चंदनाचे झाडाचे गाभ्याचे तुकडे, कुन्हाड, किकरा कानस, दुचाकी असा एकूण ७० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# अंगारिका चतुर्थीनिमित्त श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीला मोठी गर्दी

## मंदिर व्यवस्थापन समितीच्या ढिसाळ कारभारामुळे भाविकात नाराजी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ ऑगस्ट**

हिंगोली शहरातील गड्डी पीर गल्लीतील प्रसिद्ध श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात अंगारकी चतुर्थी निमित्त भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. श्रावण महिन्यातील या विशेष दिवशी दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून गणेशभक्त हिंग- ोलीत दाखल झाले होते. मात्र, मंदिराच्या व्यवस्थापनातील ढिसाळपणामुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

मंदिरातील गर्दी नियोजनाअभावी भक्तगण अक्षरश: भरडले जात होते. राज्यभरातून आलेले भक्त तासनतास रांगेत उभे हो- ते. कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने त्यांना दर्शनासाठी मोठा त्रास सहन करावा लागला. महिला, लहान मुले आणि वृद्धांची मोठी गैरसोय झाली. संस्थेकडून पिण्याच्या पाण्याची किंवा इतर कोणत्याही मूलभूत सुविधांची सोय करण्यात आली नव्हती, त्यामुळे भक्तगणांमध्ये तीव्र नाराजी दिसून आली.

या मंदिराची ओळख 'नवसाला पावणारा गणपती' अशी राज्यभरात आहे. त्यामुळे येथील ख्यातीमुळे मोठ्या संख्येने भक्त दर्शनासाठी येतात. मात्र, या प्रसिद्धीला साजेशी कोणतीही व्यवस्था नसल्याने भाविकांनी तीव्र संताप व्यक्त केला. संस्थेने भाविकांच्या सोयीकडे लक्ष द्यावे, अशी मागणी अनेक भक्तांनी केली.

केवळ मंदिरच नाही, तर मंदिराच्या बाहेरही परिस्थिती अत्यंत बिकट होती. वाह- तूक कोंडीही एक मोठी समस्या बनली होती. अनेक भाविकांनी आपली वाहने रस्त्यावरच मिळेल तिथे लावली होती, ज्यामुळे इतर वाहनांना ये-जा करणे कठीण झाले होते. वाहतूक शाखेने यासंदर्भात कोणतेही नियोजन केलेले नव्हते. वाह- तूक पोलिसांचा अभाव असल्याने वाह- तूक नियंत्रणाचे कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत. यामुळे संपूर्ण परिसरातील वाहतूक ठप्प झाली होती आणि पायी चालणाऱ्या भाविकांनाही त्रास होत होता.

या सर्व प्रकारामुळे प्रशासनाच्या आणि मंदिर व्यवस्थापन समितीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा म हत्त्वाच्या धार्मिक स्थळी आणि विशेष दिवसांमध्ये योग्य व्यवस्थापन आणि सुविधा देणे आवश्यक असताना, त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल भाविकांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन भविष्यात तरी अशा प्रकारच्या गैरसोयी टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा अनेक भक्तांनी व्यक्त केली. जर या समस्यांकडे दुर्लक्ष केले तर, या मंदिराची धार्मिक ओळख टिकवून ठेवणे कठीण होईल, असेही मत काही भक्तांनी व्यक्त केले. यावर त्वरित कारवाई करण्याची गरज आहे.

# उद्या भाजपची तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

भारतीय जनता पक्षाच्यावतीने शहरातून दि १४ ऑगस्ट रोजी तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. शहरातील छत्रपती शिव- ाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यापासून तिरंगा रॅलीला सुरूवात होणार आहे. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तिरंगा रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. या रॅलीत व्यापारी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष घुगे यांनी केले आहे.